## कृष्ण जन्म

रात्रीच्या गर्भामधूनि
येई लखलख ज्वाळा
बंदिवासात देवकीला
अद्भूत प्रसूति कळा

क्रुरकंसाच्या छाताडा
रक्त रंजीत तो टिळा
स्नेह वाटाया जगाला
आलाआला घननिळा

यमुनाआईचा ऊर दाटे
पदस्पर्श नाजूक केला
श्रावणात दिवाळीसण
सुखआनंद गोकुळाला

धेनुस्तन झरझर वाहे
पान्हा फुटे भाकडाला
माझेचं हे बाळ गोजीरे
स्वप्न हर एक आईला

भगिनी निश्वास सोडी
आला बंधु रक्षणाला
दुष्ट शक्ती कापु लागे
यम आला भक्षणाला

गोपीकालाजून लपती
आला द्राड छळायला
खुशीत्या बालगोपाळा
सवंगडी ये खेळायला

व्यासलेखणी पाझरली
नायक महा भारताला
सुख सांगू कुणा कुणा
अहो कृष्णजन्म झाला

–हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..

## गोविंदा पथक

दही हंडी फोडताना
झाले जीवनसार्थक
रात्रंदिवस तो सराव
प्रयास केले अथक

शास्त्र शुध्द शिक्षण
तत्पर गोविंदापथक
अपघात होता नाही
कुणा सोयरे सूतक

चार दिवस चौकशी
शांत बसतात पृथक
स्थाई अपंगत्व आले
शकले होते मस्तक

बक्षीसे सारे निष्फळ
पडद्याआड रे हस्तक
कसे रचायचे थरांना
बनवले नाही पुस्तक

दुसरा गोविंदा शोधा
दारावर देती दस्तक
चूक घडली कुणाची
कुणाचे माथी पातक

कोण आहे निष्णात
हतबल होई स्नातक
सुरक्षा हमीची कमी
प्रतिक्षेत रे आजतक

विमा संरक्षण गायब
वाट पाहतात चातक
आपण जपा स्वतास
खेळ खेळता घातक

– हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

# वाचाल तर वाचाल !

सुसंस्कृत आणि आदर्श जीवन असावे ही प्रत्येकाची अपेक्षा असते .पण हिच अपेक्षा पूर्ण होण्यासाठी आपले आचार विचार योग्य, उत्तम आणि दर्जेदार असले पाहिजेत. दैनंदिन जीवनात आहाराचं महत्व जितकं आहे तितकंच महत्त्व विचारांचे आहे. त्यामुळे योग्य जेवण वेळेवर आणि व्यवस्थित घेतले तर आपल्याला योग्य जीवनपोषणमूल्ये मिळतात त्याप्रमाणे योग्य विचारांसाठी योग्य संस्कार तसेच चांगल्या पद्धतीचे वाचन असणे गरजेचे असते. माणूस हा कायम विद्यार्थी असतो, त्यामुळे त्याने सतत आयुष्यभर कायम कुठल्या ना कुठल्या पद्धतीने शिकत राहायला हवे. वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या प्रकारचे जीवन हितकारक संस्कार आपल्याला मिळत असतात.

त्यापैकी विचारांचे संस्कार आपल्याला वेगवेगळ्या साहित्यातून मिळत असतात. सुसंकृत विचारांचे संस्कार हे साहित्याच्या अनमोल खाणीतून मिळतात, वाचनातून मिळणारी ऊर्जा काही औरच असते. प्रभावी, उत्कृष्ट आणि दर्जेदार विचारांचे संस्कार हे आपल्याला साहित्यातून मिळत असतात. तसेच जीवन जगत असताना आपले आचार, विचार, वर्तणूक, गुण, दोष, चांगले, वाईट विचार, त्याच बरोबर आपली सामाजिक प्रतिमा, प्रतिष्ठा, ह्या सगळ्या महत्त्वाच्या बाबी ह्या आपल्यावर झालेल्या वेगवेगळ्या संस्कारांवरच अवलंबून असतात. एखाद्यावर काही कारणाने अयोग्य संस्कार झाले जरी असतील तरी दर्जेदार वाचनाने त्या विचारांमध्ये फरक पडू शकतो. लहानपणापासून आपल्यावर अनेकांचे संस्कार होत असतात. बालपणी आई , शाळेत गेल्यावर शिक्षण घेताना शिक्षक, आपले मित्रमैत्रिणी, शेजारी,



नातेवाईक, समाजजीवन यांचा आपल्या वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या प्रकारचे संस्कार होत असतात आणि आपण त्यातून घडत असतो. विचारांचे संस्कार आपल्या जीवनात खूप महत्वपूर्ण भूमिका निभावत असतात ते संस्कार आपल्याला उत्कृष्ट आणि दर्जेदार साहित्यातून मिळत असतात. त्याचे परिणाम स्वरूप आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होत असतात आणि त्या संस्कारातून आपण घडत असतो. या सगळ्या संस्कारांमध्ये विचारांचे संस्कार हे जीवनात सकारात्मक उर्जा निर्माण करतात आणि आपल्या आदर्श जीवन जगण्याची प्रेरणा देत असतात. म्हणून हे विचारांचे संस्कार खूप महत्वपूर्ण आहेत. म्हणून आपल्या जीवनामध्ये दैनंदिन आणि नियमित दर्जेदार साहित्य आपण वाचन केलं पाहिजे. अनादी काळापासून ते आज आजपर्यंत मानवी जीवनातील विचारांच्या संस्काराचे साहित्य हे उगमस्थान आहे. वाचणाऱ्यासाठी खूप मोठा खजिना साहित्यिकांनी लिहून ठेवला आहे आणि सध्याच्या गतिमान, आधुनिक तसेच तंत्रज्ञान आणि विज्ञान युगातील कालखंडातसुद्धा साहित्य हे मानवी जीवनातील मूलभूत आणि पायाभूत संस्काराचे प्रेरणास्थान आहे.

साहित्य ही कलाकृती कल्पनाप्रधान असली तरी साहित्याची पाळेमुळे वास्तवाच्या जमिनीवर खोलवर रुजलेली असतात. वास्तवातील घटना, प्रसंग याची निवड करून त्याची पुनर्रचना करून आणि त्यामध्ये स्वतःची नवी भर घालून साहित्यिकाने नवनिर्मिती केलेली असते. आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे साहित्य हे लोकहितार्थ असते. म्हणजे साहित्याची रचना समाजाचं हित साध्य होण्यासाठीच केलेली असते. साहित्यातून मिळणारे विचारांचे संस्कार आपल्याला आदर्श जीवन जगण्याची आणि यशस्वी होण्याची प्रेरणा देतात. तसेच साहित्यातून मिळणारे संस्कार आपल्याला माणूस म्हणून जगण्याचीदेखील प्रेरणा देतात ज्या पद्धतीच्या साहित्याच आपण अनुकरण करतो वाचन करतो किंवा ऐकतो त्या पद्धतीने आपलं जीवन घडत असतं म्हणून आदर्श आणि उत्कृष्ट दर्जाचे दर्जेदार साहित्य आपण नियमित दैनंदिन वाचन केले पाहिजे, ऐकले पाहिजे कारण जीवनातील अमूल्य महत्वपूर्ण असे विचारांचे संस्कार आपल्याला साहित्यातून मिळत असतात. त्याचप्रमाणे जीवन हितार्थ व कल्याणकारी व्हावं म्हणून दैनंदिन जीवनात एक विशिष्ट असा वेळ आपण आध्यत्मिक साहित्य वाचन नक्कीच केलं पाहिजे जेणेकरून आपले संस्कार आणि संस्कृती बळकट होण्याबरोबरच जीवनपथ बळकट होण्यास मदत होईल आणि आपोआप सुसंस्कृत विचारांचा प्रभाव निर्माण होऊन एक वेगळी उर्जा आपल्या जीवनात संचारेल यामध्ये शंका नाही.

**प्राची परचुरे वैद्य**
**मो.नं. ९७६७६१३१४२**

# मराठी भाषेचे महत्व...

मराठी भाषा म्हणजेच जसं वळवेल तशी वळणारी भाषा! असं म्हणतात जे मराठी भाषा बोलतात ते खरच भाग्यवान आहेत. मराठी भाषा म्हणजे महाराष्ट्राचा स्वाभिमान! अतिशय सुंदर, गोड आणि आवाजात जोश आणणारी ही भाषा. अतिशय जुनी आणि प्राचीन अशी या भाषेची परंपरा. मराठी भाषेची वाटचाल ही अखंड आणि उज्वल आहे.

संत ज्ञानेश्वर म्हणतात, माझी मायबोली कशी? तर अमृतलाही पैजेवर जिंकणारी!सर्व संत कवींनी मराठी भाषेला त्यांच्या भक्तिभावाने सजवले. ओवी अभंगाची लयलूट केली आणि भाषेचा देव्हारा आत्मतेजने उजलून टाकला.मराठी भाषेचा इतिहास खूप जुना आहे. १३ व्या शतकातील महान वारकरी संत ज्ञानेश्वर यांनी भगवद्गीतेवर मराठीत ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिला. त्यांचे समकालीन, संत नामदेव यांनी मराठीत तसेच हिंदी भाषेत श्लोक, अभंग लिहिले. मुकुंदराज हे १३ व्या शतकातील प्रसिद्ध कवी होते, त्यांनी विवेक-सिद्धी आणि परममित्र ग्रंथ लिहिले जे पौराणिक वेदांताशी संबंधित आहेत. संत तुकाराम महाराज यांनी मराठी एक समृद्ध साहित्यिक भाषा बनविली.

संत तुकाराम यांनी त्या वेळी सुमारे ३००० अभंग लिहिले आणि भाषेचे महत्व अजुन वाढले.संस्कृत भाषेने मराठी भाषेला शब्द भांडार दिले आणि अधिक समृद्ध केले.



संतकवी नंतर आलेल्या पंडित कवींनी संस्कृत भाषेतील कथा काव्यसंग्रहातून अख्यान काव्याचा खजिना भरून टाकला. पुढे जाऊन शूर शाहिरांनी पोवाडे , लावण्या रचून वीर आणि शृंगार रसांची उधळण केली. अशी ही मराठी भाषा उदयास आली. मराठी ही राजभाषा म्हणून समजली जाते. आपण १ मे हा दिवस महाराष्ट्र दिवस म्हणून साजरा करतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषेचा मान अजुन वाढवला. त्यांनी मराठी बोलीस जास्त महत्त्व दिले.

### आज मराठी भाषेला किती महत्त्व राहिले आहे?

आज आपण पहिले तर मराठी भाषेच्या डोक्यावर रजमाण्यतेचा मुकुट आणि अंगावरची वस्त्रे मात्र फाटकी राहिली आहेत. गेल्या ५० वर्षात या भाषेचे स्वरूप धेडगुजरी असे झाले आहे. सगळीकडे पावलोपावली इंग्रजी भाषेचा वापर जास्त केला जातं आहे. ज्या इंग्रजांनी आपल्यावर एवढे वर्ष वर्चस्व गाजवलं आज त्यांच्याच भाषेला आपण जास्त महत्व देत आहोत. म ग




ऑफिस असो अथवा रोजचे व्यवहार असो सुपुत्रांना या भाषेचा वापर करताना एवढी लाज कसली वाटतं आहे? आपल मुल चांगलं शिकावं म्हणून त्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातलं जातं. मग त्याच इंग्रजी चांगलं व्हावं म्हणून त्याच्यासोबत घरात इंग्रजी बोलल जात.

इंग्रजी भाषेचा इतका मारा असताना मराठी भाषा शिकण्याची अपेक्षा कशी ठेवली जाते? इंग्रजी लिहिता वाचता नाही आलं तर पुढे जाऊन नोकरी मिळणार नाही अशी लाजिरवाणी अवस्था आज समाजात आहे. इंग्रजी आल म्हणजे अती हुशार अथवा उच्चभ्रू समजल जात.

मग मराठी भाषा येणारा हुशार नसेल का? कारण आज आपणच या संकल्पना तयार केल्या आहेत. एखाद्याला इंग्रजी बोलता येत नसेल तर त्याला कमी लेखलं जात. त्याला कमी किंमत दिली जाते. म्हणजे इथे माणसाची गुणवत्ता ही त्याच्या बोलीभाषेवरून ठरवली जाते, आणि हीच कारणे आहेत की, आज आपली मराठी भाषा कुठेतरी हरवत चालली आहे. जी आपली जन्मभूमी आहे, कर्मभूमी आहे, मायभूमी आहे. तेथे जन्माला आलेली ही आपली मराठी मायबोली! मग अशी पवित्र असलेली भाषा बोलताना भिती कसली वाटते आपल्याला?

आपण पाहतो जेव्हा मोठ्या मोठ्या कंपनी मध्ये आपण नोकरी करण्यासाठी अर्ज भरतो तेव्हा नेहमी पहिला प्रश्न असतो इंग्रजी बोलता येत का? इंग्रजी लिखाण चांगलं आहे का? मग मराठी, हिंदी या भाषा येत असतील तर कंपनीच काम थांबेल का? की ज्ञान कितीही असुदे पण इंग्रजी आलच पाहिजे असं ठरवणं अतिशय लज्जास्पद आहे. आज मराठी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आल्या आहेत. इंग्रजी शाळांची वाढती संख्या, भरमसाठ फी आणि एडमिशन ची घाई यामुळे मराठी भाषा अजुन मागे पडते की काय याची चिंता वाढली आहे.

### मराठी आलीच पाहिजे!

तुम्ही आज जर महाराष्ट्रात राहत असाल आणि तुम्हाला मराठी येत नसेल तर ही एक लाजिरवाणी गोष्ट आहे. ज्या ठिकाणी आपण जन्म घेतला, जेथे महापुरुषांनी मराठी भाषेला घडवलं, वेळप्रसंगी आपल्या प्राणांची आहुती दिली त्या मराठी भाषेचा सन्मान हा आपण केलाच पाहिजे. आपण जन्म घेतो तेव्हा पहिला शब्द आई बाबा म्हणतो, म्हणजे आईच्या पोटात असतानाच आपल्या कानात मराठी भाषेचे शब्द रुजलेले असतात. आपल्याला बोलायला शिकवणारी अशी ही मराठी भाषा.आपण वेगळे वेगळे सण उत्सव साजरे करतो. आपली मराठी संस्कृती ही सगळ्यात सुंदर संस्कृती समजली जाते. मराठी साज शृंगार, मराठी बाणा म्हणजे आपल्या सगळ्यांसाठी गर्वाची गोष्ट आहे. मराठी भाषा संस्काराचे अतिशय सुंदर धडे देत असते. मराठी भाषेतील शब्द भांडार अतिशय सुंदर, सहज बोलता येईल आणि समजेल असे आहे. म्हणजे मराठी भाषा बोलणारा कोणतीही भाषा लवकर शिकतो. साधी राहणी आणि उच्च विचार सरणी अस मराठी लोकांना समजल जात.मराठी भाषा सगळ्यात श्रीमंत भाषा समजली जाते.मराठी भाषेत अनेक प्रकारचे साहित्य लिहिले गेले आहे. मराठी भाषेतील काव्य, कथा, कादंबरी,उखाणे, चित्रपट अतिशय सुंदर, अर्थपूर्ण आहेत. मराठी भाषेत असणारे कोणतेही साहित्य आपल्याला भाषेवर प्रेम करायला भाग पाडते. त्याचप्रमाणे मराठी भाषेतील अनेक पुस्तके जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहेत. मराठी भाषेची पोहोच जगभरात आहे. प्रेम, जिव्हाळा , आपुलकी या सगळ्यांचच एकत्र मिश्रण म्हणजे आपली मराठी मायबोली. अगदी गोड स्वरात बोलली जाते ती आपली मायबोली!पण आज याच मराठी भाषेचे महत्त्व कमी होत आहे. इंग्रजी भाषेचा हट्ट जास्त धरला जात आहे. भविष्यात या मराठी भाषा नामशेष होऊ नये यासाठी आपण सर्वांनी मिळून भाषेचे जतन केले पाहिजे.मराठीचे सुंदर, शुद्ध, तरल स्वरूप चिरंतन करण्यासाठी दत्तो वामन पोतदार यांनी सांगितलेला मराठीचा कर्म योग सर्वांनी स्वीकारला पाहिजे. मी कोठेही स्वाक्षरी करीन ती शुद्ध मराठीच, असा आग्रह सर्वांनी धरला पाहिजे.

दोन मराठी माणसे एकत्र आली की त्यांनी, तसेच घरात लहानपणापासून मराठीत संवाद साधला पाहिजे. आपल्या शहरातील इतर भाषिकांना ही आपल्या मराठीच्या शुद्ध स्वरूपाची ओळख करून दिली पाहिजे. फक्त अमृतालाही पैजा जिंकणाऱ्या आपल्या मातृभाषेचा, मराठी भाषेचा विचार कधीही पडून नाही दिला पाहिजे. आपल्या साहित्यावर प्रेम करणे, आदर करणे आणि त्याची जपणूक करणे हे आपल्या च हातात आहे. आपल्या महाराष्ट्राचं वैभव जपण आपल्याच हातात आहे. म्हणूनच, मराठी भाषेचा त्याच्या जपणुकीचा प्रसार झालाच पाहिजे आणि मराठी भाषेचे बीज आपण पेरले पाहिजे. शेवटी एवढंच म्हणावंसं वाटतं, आमच्या महाराष्ट्राची शान आमची भाषा मराठी, मायभूमीची लाडकी भाषा अमुची मराठी

**मराठी बोलूया! मराठी जपुया !**

**श्री.स्वामी दळवी**
**नऱ्हेगाव (पुणे)**
**मो.नं. ९८२२२६९०९८**

# मद्य दरवाढीमुळे अनेक 'देशी'च्या मोहजालात !

## विदेशीच्या भाववाढीमुळे अनेकांनी बदलला ब्रँड

सध्या देशी-विदेशी मद्याचे भाव गगनाला भिडल्यामुळे आता काही नशाखोर मंडळी ब्रँड बदलत देशप्रेमी बनल्याचे चित्र सध्या पहायला मिळत आहे. दारूड्या लोकांची मैत्री ही कायम पक्की असल्याचे समाजात नेहमीच बोलले जाते. मात्र, सध्या मद्याच्या भाववाढीमुळे ही उदार मैत्री ही दाता शोधण्यात व्यस्त आहे.

विदेशी दारू ढोसण्यासाठी दोन-चार मित्र एकत्र होऊन ही एकमेकांचे पैसे जमा करून ही केवळ एखाद्याच बाटलीचे जजमेंट होत असल्यामुळे त्यामध्ये कोणाचीच नशा भागत नाही. त्यामुळे एकमेकांचे मित्रच आता एकमेकांना कट मारून चक्क देशी दारूच्या दुकानाकडे धाव घेतांना दिसू येऊ लागले आहेत. विदेशी मद्याच्या भाववाढीमुळे सर्वसामान्य, काबाडकष्ट करणारी मंडळी आता चक्क हातभट्टी गावठी दारू आणि फुग्यांचा आस्वाद घेताना दिसून येऊ लागली आहे. ल या



दुकानांसमोर मद्यपींची गर्दी होत असून, बार चालकांना चांगलाच फटका बसला आहे. अचानक

ब्रँड बदलामुळे मद्यपींची आर्थिक तारांबळ उडत असताना राज्य सरकारने देशी-विदेशी दारूवरील टॅक्स वाढविल्यामुळे देशी-विदेशी दारूचे मद्य भाववाढीवरही मात्र मद्यपींकडून चांगलीच टीका होतांना दिसून येऊ लागली आहे. अनेक जण राज्य सरकारच्या योजनांमुळे मद्याचे भाव वाढल्याचे सांगत आहेत.विदेशी मद्याच्या भाववाढीमुळे परमिट रूम, हॉटेल यांना मोठा फटका बसला असून, ते बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

### गुपचूप घ्यायची अन् बिनधास्त घर गाठायचे !

अनेकदा ५ – १० मित्र एकत्र येऊन पार्टी करत होते. त्यावेळी विदेशी मद्यही स्वस्त होते. सध्या या मद्याची भाववाढ झाल्याने. एकत्र मित्रांचा घोळका आता कमी प्रमाणात दिसून येते आहे. आपापली स्वतः ची गुपचूप घ्यायची अन् बिनधास्त घर गाठायचे असाच काहीसा कार्यक्रम सध्या अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये दिसत असल्याचे बोलले जात आहे.

**- श्री.वसंत रांधवण**
**अहिल्यानगर**

# स्वकर्तृत्वावर भरारी घेणारं हरहुन्नरी व्यक्तिमत्व !

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर सारख्या ग्रामीण भागात सर्वसामान्य कुटुंबातील कर्तृत्व, नेतृत्व व दातृत्ववान या आपल्या अजोड गुणांच्या जोरावर तालुक्याच्या राजकारणात अनेक वर्षांपासून आपला ठसा उमटवणारे राजकारणापेक्षा समाजकारणाला जास्त महत्त्व देऊन राजकारणाचे धडे गिरवत समाजाशी गावाशी आपुलकीचे नाते निर्माण करणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रदिपकुमार (बाळासाहेब) खिलारी सर हे एक नाव मला अधिक भावते.

गावातील विकास कामांसाठी ग्रामपंचायत मधील सरपंच व सर्व सहकाऱ्यांशी खेळीमेळीच्या वातावरणात राहाणारा, वेळप्रसंगी धडाकेबाज निर्णय घेणारे ग्रामस्थांच्या मुलभूत गरजा व विकासाला प्राधान्य देण्याची वृत्ती सुख दुःखात वेळ प्रसंगी धावून जाऊन समस्या सोडवण्याची समयसूचकता व प्रसंगावधान राखून तोडगा काढण्याची निर्णय क्षमता यामुळे सर्वसामान्य जनतेच्या मनात अढळ स्थान आहे.

माजी आमदार स्वर्गीय वसंतराव



(दादा) झावरे पाटील यांचे विश्वासू सहकारी म्हणून बाळासाहेब खिलारी हे लोकांच्या हृदयात घर करून आहेत. राजकारणाचे बाळकडू माजी आमदार स्वर्गीय वसंतराव झावरे पाटील यांच्या कुटुंबापासून मिळाले असल्याने बाळासाहेब खिलारी ही एक व्यक्ती किंवा घरापुरती मर्यादित कधीच राहिली नाही. खासदार निलेशजी लंके यांचे कट्टर समर्थक व खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष आहेत. खासदार साहेबांच्या पाठीशी पुर्णवेळ खंबीर पणे उभे राहणारे धाडसी डॅशींग व निर्भिड हरहुन्नरी व्यक्तिमत्व म्हणजे बाळासाहेब खिलारी प्रत्येक उपक्रमांमध्ये खिलारी सर यांचे योगदान राहिलेले आहे. मग ते कोरोनाच्या काळात लाखो वाटसरूंसाठी सुरू केलेले अन्नछत्र असेल किंवा टाकळी ढोकेश्वर आणि कर्जुले हार्या सिमेवर एक हजार बेड क्षमतेचे शरदचंद्र कोविड केअर सेंटर असेल खिलारी सरांनी खूप परिश्रम घेतले. भाळवणी येथिल नागेश्वर मंगल कार्यालय दुसऱ्या वर्षी सुरू करण्यात आलेल्या शरदचंद्रजी पवार आरोग्य मंदिरात हजारो रुग्णांना बरे करण्यामध्ये खासदार निलेशजी लंके यांना यश मिळाले. त्याठिकाणीही बाळासाहेब खिलारी यांनी रात्रंदिवस काम केले. त्यांनी करोना रुग्णांची मनोभावे सेवा केली. निलेश लंके यांचा संकल्प सिद्धीस नेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. लोकसहभागातून सुरू करण्यात आलेल्या या कोविड केअर सेंटरची महती सर्वदूर पोहोचली. देश विदेशात या उपक्रमाचे कौतुक झाले. त्यासाठी पगंती पासून ते गाव पहारे याचे उत्तम नियोजन आणि व्यवस्थापन करण्यात आले. त्यामध्ये बाळासाहेब खिलारी सरांचा सिंहांचा वाटा होता. मला खासदार निलेशजी लंके यांच्याकडून उर्जा , प्रोत्साहन, पाठबळ नेहमीच मिळते. असे सत अत्यंत प्रांजळपणे सांगतात. खासदार साहेबांनी फक्त लढ असे सांगितल्यानंतर काम करण्यासाठी शंभर हत्तींचे बळ मिळते असेही ते म्हणतात. म्हणजे खासदार निलेशजी लंके यांच्याशी अत्यंत एकरूप झालेला कार्यकर्ता म्हणजे बाळासाहेब खिलारी सर होय.खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष म्हणून ते काम पहात आहेत. शिक्षक नेता म्हणून सुद्धा बाळासाहेब यांची वेगळी ओळख आहे. आणि महाराष्ट्र राज्यातील चंदन उत्पादक शेतकऱ्यांचे ते नेतृत्व करीत आहेत, सरांच्या सौभाग्यवती या टाकळी ढोकेश्वर गावच्या सरपंच आहेत. बाळासाहेब खिलारी हे माझ्या आयुष्यातलं अत्यंत हृदयस्पर्शी समीकरण बनलेले आहे. आज स्वतंत्र्य दिन त्यानिमित्ताने त्यांना खूप खूप शुभेच्छा...!

**- श्री.वसंत रांधवण**
**अहिल्यानगर**

# उपवर मुलांच्या लग्नाची भीषण समस्या




सध्याच्या काही ज्वलंत समस्येपैकी 'मुलांच्या लग्नाची चिंता' ही एक अत्यंत भीषण आणि गंभीर समस्या आहे. उपवर मुलांचे पालक या चिंतेने खूपच त्रस्त आहेत. खरंतर लग्न हे एक् पवित्र बंधन आहे. भारतीय संस्कृतीत या बंधनाचे अत्यंत महत्व आहे. कारण लग्न हा फक्त एक संस्कार नसून दोन व्यक्ती.. दोन परीवारांचे मिलन असते. विवाह म्हणजे व्यक्तिममधील नाते संबध निर्माण करणारे सामाजिक बंधन अथवा कायदेशीर करार होय. म्हणूनच मॅरेजसर्टिफिकेटला कायद्याच्या दृष्टीने खुप महत्व आहे. लग्न होताच ते रजिस्टर करणे बंधनकारक आणि उचित आहे. विवाह संस्था संस्कृती आणि उपसंस्कृतीस अनुलक्षून विवीध पद्धतीने व्यक्ती अंतर्गत नाते, सहसा जवळकीचे आणि लैंगिक मान्य करते. अशा संबधास विवाह म्हणतात, आणि जी प्रक्रिया किंवा समारंभ या नात्याची सुरूवात करून देतो त्यास लग्न असे म्हणतात, व या नात्यास लग्न गाठ असे संबोधले जाते. असे हे विलक्षण पवित्र बंधन ! पण आताची परिस्थिती पाहता आधी तर लग्ने जमत नाहीत आणि झाली तरी बरेचदा टिकत नाहीत. त्यामुळे मुलांचे आई वडिल, ते स्वतः सुद्धा नैराश्याच्या बळी पडत आहेत असे दिसून येते आहे. अर्थात याची अनेक कारणे आहेत आणि याचा गांभीर्याने विचार करूया...

**समस्येवर ताबडतोब इलाज शोधण्याची खूपच आवश्यकता आहे.**

पुर्वी लग्नगाठ ही स्वर्गातच बांधली जाते, जे होते ते ईश्वरांच्या मर्जीनेच होते अशी लोकांची मनोवृत्ती होती. आता थोडीशी विचारसरणी बदलत चालली आहे, हे चांगलेच आहे. पुर्वी समाजाच्या दृष्टीने मुली म्हणजे आई वडिलांच्या चिंतेचाच विषय होता. मुलगा व्हावा यासाठी नवस केले जायचे. मुलगा म्हणजे कुलदीपक, घराण्याचा वंश वाढवणारा असल्यामुळे त्याचे कोडकौतुक व्हायचे, अभिमान वाटायचा, त्यांना शिक्षण द्यायचे तर मुलींना मात्र दुय्यम स्थान होते. कारण उपवर झाली की लग्नाचा खर्च, हुंडा द्यावा लागणार याची चिंता.. मग शिकवून, खर्च करून काय करायचे त्यांच्यावर, शेवटी ते दुसऱ्याच्याच घरी जाणार अशी मुलींच्या आईवडिलांची मनोवृत्ती होती. त्यामुळे कधी कधी तर मुलगी झाली की तिचा बळीही दिला जायचा क्रूरपणे. पण काळानुरूप हा दृष्टिकोन बदलला. शिक्षणाचे महत्व पटले, त्यामुळे विचारातसुद्धा प्रगल्भता आली. ती शिकली तर पूर्ण समाजच बदलू शकतो हे समजल्यावर... मुलांच्या बरोबरीने मुलींनांही शिकवू लागले. त्यामुळे बदल होऊ लागले पण तरीही हुंडा, रुढी परंपरा, पुरुषप्रधान संस्कृतीमुळे काहीजणाचे विचार सहज बदलणे कठीण आहे.

त्यामुळे मुली आणि मुले यांचे प्रमाण व्यस्तच होते. त्यामुळे तेंव्हा मुलांची संख्या मुलींच्या संख्येपेक्षा जास्त असल्यामुळे ही समस्याच नव्हती. उलट द्विभार्या पद्धत सुद्धा मोठ्या प्रमाणात होती. राजे किंवा मोठ्या हुद्द्यावरील लोक तर अनेक अंगवस्त्र अभिमानाने बाळगत. तेंव्हा तशीच परिस्थिती होती.

पण आता मात्र लोकांचे शिक्षणामुळे, समाजातील बदलामुळे विचार बदलल्यामुळे त्याच्या अगदी उलट चित्र दिसत आहे. मुली आता मुलांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात दिसत आहेत. त्यांना मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळे, सवलती, सुविधा यांमुळे काकणभर जास्तच प्रगत होत आहेत. मुलगा आणि मुलगी यांना आता कायद्यानेही समान हक्क, स्थान मिळत असल्यामुळे मुलींची संख्या वाढते आहे या उलट 'एक या दो' नंतर आता' एकच बस्स मुळे मुलगी झाली तरी तेवढाच आनंद होतो. त्यामुळे मुली... मुलांची संख्या मात्र खुप घटत जाताना दिसत आहे . आणि त्याचे परिणाम आज लग्नाच्यावेळी प्रकर्षाने जाणवायला लागले आहेत.

मुलींच्या जास्त शिक्षणामुळे त्यांच्या जोडीदाराच्या बाबतीतील अपेक्षा सुद्धा तेवढ्याच वाढलेल्या आहेत. आपल्यापेक्षा जास्त शिकलेला, जास्त कमावणारा जोडीदारच त्यांना आणि त्यांच्या पालकानाही असावा वाटतो. हे चुकीचे नाहीच, पण मुलींचे प्रमाण कमी असल्यामुळे स्वतः कडे काहीच नसलेल्या, खेड्यात राहणाऱ्या मुलींना सुद्धा अगदी पुणे किंवा मुंबई अशाच शहरातील, त्यात सुद्धा मुंबई इस्ट मधील मुलींना वेस्ट मधला मुलगा सुद्धा नको असतो कारण मुलीला नोकरीला लांब जावे लागेल ? पुण्यातील मुलींना पुण्यातलाच मुलगा हवा असतो. त्यांची दुसरीकडे जाण्याची आजिबात तयारी नसते. मग त्यासाठी कितीही चांगले स्थळ असले तरी सरळ नकार देतात. सगळ्याच मुलींची आणि त्यांच्या पालकांची

नोकरी करणारा, दिसायला छान, स्वतःचे घर असलेला, जास्त लोक घरात नसलेला असा नवरा मुलगा असावा अशी अपेक्षा असते. मग व्यवसाय, बिझनेस कितीही छान असला, उत्पन्न भरापुर असले तरीही विचार सुद्धा करत नाहीत. अर्थात हे अगदीच चुकीचे आहे असे नाही, पण त्यामुळे कित्येक मुलांची वेळेवर लग्ने जमत नाहीत ही वस्तुस्थिती मात्र आहेच.

खेड्यातील मुलांची तर समस्या जास्तच भीषण आहे. टीव्ही वर आपण 'शेतकरी नवराच हवा', किंवा खेड्यातील चित्रणावर घेतलेल्या कित्येक मालिका आनंदाने पाहतो, पण प्रत्यक्षात मात्र चित्र, परिस्थिती खुपच बिकट, वेगळी आहे. माझ्या परिचयातील एक कुटुंब आहे, त्यांचा पुतण्या दिसायला एकदम उंचापुरा, रुबाबदार आहे. अतिशय कष्टाळू, सरळ स्वभावाचा, खुपच हुशार अगदी लहानपणा पासूनच! त्यांची गावाकडे भरपूर

बागाईत शेती असल्यामुळे सधन आहेत. गायी, म्हशी, सुरेख बैलजोड्या तर आहेतच पण शेतीची अगदी ट्रॅक्टर पासून ते मळणी यंत्रापर्यंत सर्व अत्याधुनिक यंत्र आहेत. शेतातील घर सुद्धा एकदम प्रशस्त, आणि शहरातील सर्व सुखसोयी असलेले! सुंदर, टुमदार बंगलाच म्हणा ना! लहानपणापासून गावात वाढल्यामुळे मुलाला गावाची, शेतीची ओढ.. त्याने एग्रीकल्चर मधून इंजिनिअरींग केले. शेतात नवनवीन प्रयोग करत आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून खूपच सुंदर शेती करत आहे. पण केवळ खेड्यात जाण्याची आणि शेती करणारा नवरा नको अशी मुलींची मनोवृत्ती असल्यामुळे आता चाळीशी झाली तरी त्याला लग्नासाठी मुलींचा होकार नाही. काही मुलींच्या पालकांच्याही काहीवेळा अवास्तव अपेक्षा असतात. त्यांना मुलगा नोकरी करणाराही पाहिजे असतोआणि शेतीही असावी अशी अपेक्षा असते. असंख्य मुलांची ही समस्या झाल्यामुळे खेड्यात जास्त शिक्षण न घेता मुले शहरात येऊन छोटी मोठी मिळेल ती नोकरी करत आहेत. पण त्यामानाने मग उत्पन्न कमीच असते. मग अशा मुलांची लग्ने तर होतात, पण मुलींच्या गरजा, अपेक्षा वाढत्या असल्यामुळे बरेचदा घटस्फोट होऊन आता ही घटस्फोटाची समस्याही जोमाने वाढताना दिसत आहे.

समाज सुजाण शिक्षित झाला असत्यामुळे आता आधुनिक तंत्रज्ञान, विविध माध्यमे यांचा सर्वत्र वापर होत आहे. याचे चांगले आणि वाईट दोन्ही परिणाम होताना दिसत आहेत. लग्न ठरवण्याच्या सोयीसाठी वधुवर विवाह मंडळे, त्यांचे मेळावे होताना आपण पाहतोच. यातून असंख्य विवाह जुळतात, यशस्वी सुद्धा होतात तर काही असफलही होतात. याचे मुख्य कारण म्हणजे दोन्ही बाजूचे लोक अगदीच अपरिचित असतात, त्यांच्या राहणीमान, विचारात मोठी तफावत असते, नाहीतर मुलगा आणि मुलगी एकमेकांना जास्त ओळखतच नसतात थोड्या जुजबी भेटीत एकमेकांचे विचार, सवयी व्यवस्थित समजत नाहीत मग लग्नानंतर ते हळू हळू समजतात आणि ते बदलण्याची जर दोघांचीही तयारी नसेल तर अशी लग्न असफल होतात.

हिच गोष्ट आता इंटरनेट वर चॅटिंग करून मुले लग्न जमवतात या बाबतीतही घडताना दिसते आहे. काही वेळा दोघे वेगळ्या शहरात किंवा दूर रहातअसतात, दोघांनाच्याही नोकऱ्या, सुट्ट्या यांचा मेळ जमत नाही अशावेळी हा मार्ग निवडला जातो. खरंतर एका दृष्टीने हा खुपच छान, सोयीस्कर असा मार्ग आहे. एकमेकांना वेळ देऊन मनातील सर्व शंका, अडचणी समजून घेऊन त्यातून मार्ग काढता येतो, कोणताही दबाव आणि कोणतेही बंधन नसल्यामुळे मनसोक्त गप्पा मारून विचार, अपेक्षा समजून घेता येतात.

मुख्य म्हणजे यात दोघांनाही एकमेकांची आर्थिक परिस्थिती, त्यांच्या नोकरीत असलेला हुद्दा, उत्पन्न सर्व आधारकार्ड, किंवा इतर मार्गातून स्पष्टपणे समजू शकतो. आता तर मुले आणि मुली डॉक्टरांचे फिटनेस सर्टिफिकेट सुद्धा पहात आहेत कारण ही सुद्धा बदलत्या काळानुसार गरज झाली आहे. यामुळे व्यसन नसल्याची खात्री सुद्धा होते. त्यादृष्टीने ही इंटरनेटच्या माध्यमातून लग्न जुळवण्याची पद्धत काही दृष्ट्या योग्य असली तरी जशी प्रत्येक नाण्याला दुसरीही बाजू असते, तसेंच या बाबतीतसुद्धा म्हणता येईल. काहीवेळा मुले स्वतःची माहिती चुकीची देतात, सर्वसाधारण त्यावर विश्वास ठेवतात, प्रत्यक्षात चित्र वेगळेच असते. फेक सर्टिफिकेटस् देऊन खोटी

माहिती दिली जाऊ शकते. त्यामुळे फसगत होते. प्रत्यक्ष पाहणे, भेटणे, खरी माहिती काढुन खात्री करून घेतल्याशिवाय लग्न ठरवणे अयोग्यच आहे. कित्येकदा तरुण वयातील आकर्षणामुळे मुले किंवा मुली फसतात. फक्त बाह्य रंग रूपावर, खोट्या, छोट्या मोठ्या गिफ्ट्संना, वचनाना भाळतात, प्रेमात पडतात आणि काही दिवस झाले की प्रेमाचा खोटा मुखवटा गळून पडला की खरा रंग दिसतो आणि मग पश्चत्ताप होतो आणि नाते संपवले जाते. याचा परिणाम मात्र त्यांच्या बरोबरच दोन्ही परिवारातील सर्वांना भोगावा लागतो म्हणून हा जीवनातील सर्वांत मोठ्ठा आयुष्यभर परिणाम करणारा निर्णय असल्यामुळे तो अत्यंत शांतपणे विचारपूर्वक, काळजीपूर्वक, सारासार विचार करूनच घेणे गरजेचे आहे.

मुली शिक्षण घेऊन आता खूपच हुशार, धीट झाल्या आहेत पण त्याच बरोबर त्यांची चिकित्सक वृत्ती सुद्धा वाढली आहे. आधी मनासारखे उच्च शिक्षण घेणे, मग त्यांच्या अपेक्षा, अटींमुळे त्यांचीही वये वाढत चालली आहेत. मग वरसंशोधन सुरु होते. सुरुवातीला तर कुठेच ॲडजेस्टमेंट करायची त्यांची तयारी नसतेच. स्वतःच्या योग्यतेपेक्षा चांगला मुलगा शोधण्याच्या नादात चांगली स्थळेसुद्धा गमावून बसतात. नंतर हळूहळू अपेक्षा थोड्या शिथिल करतात तेंव्हा कुठे लग्न जमते. पण त्यांना ॲडजेस्टमेंट करावी लागली हे मनात राहते आणि पुढे कधी कधी वाद वाढून अगदी टोकाचे

निर्णय घेतात. पालकांनी अशावेळी थोडे समजावून सांगून पटवून देऊन त्यांचे मतपरिवर्तन करायला पाहिजे खरंतर, पण आताच्या पालकांना आपली मुलगी शिकली असल्यामुळे खुप अभिमान.. गर्व असतो आणि ती म्हणते ते योग्यच असणार याची खात्रीच असते. त्यामुळे मुली जास्तच शेफारतात आणि पुढे त्याचे दुष्परिणाम सर्वांना भोगावे लागतात.

त्यामुळे लव्ह मॅरेज असेल तर पालकांनी आता जात.. पात, श्रीमंत.. गरीब, किंवा इतर क्षुल्लक बाबींकडे दुर्लक्ष करून योग्यतेचा असेल तर लगेंच आनंदाने होकार द्यावा, मुलाकडील लोकानी सुद्धा असाच विचार करावा आणि त्याच बरोबर हुन्डा, मानपान, देणे घेणे, रितिभाती यांचा जास्त विचार करणे सोडून देणे हा उत्तम मार्ग आहे. कारण मुलगी शिक्षीत, सज्ञान असते. तिचे हित तिला कळतेच त्यामुळे आयुष्याचा जोडीदार निवडताना ती योग्यच निवडेल हा विश्वाससुद्धा ठेवला पाहिजे.

दुसरी लग्न जुळण्याच्या बाबतीतला छान मार्ग म्हणजे आता मुलींची संख्या खुप कमी असल्यामुळे जर एखाद्या मुलाला एखादी योग्य असलेली पण विधवा किंवा घटस्फोटीत मुलगी योग्य वाटली तर इतरांचा किंवा समाजाचा जास्त विचार न करता अवश्य त्यांचा विवाह करून द्यावा. त्यामुळे एकतर त्या मुलीचेही आयुष्य नव्याने सुरु होऊन छान मार्गाला लागते आणि मुलाच्या लग्नाचा प्रश्नही सुटतो. कारण नवरा लहान वयात गेला तर त्यात त्या मुलीचा काय दोष ? उलट अशा व्यक्तीला आधाराची खुप गरज असते. तो दिला तर एक म्हणजे तिला कायम याची जाणीव राहील आणि दोघांचेही आयुष्य उत्तमरित्या मार्गाला लागेल. तिच गोष्ट एखाद्या घटस्फोटीत मुलीची सुद्धा असू शकते. लग्नानंतर दोघांनाचे काहीच विचार पटत नाहीत म्हणून जर हा निर्णय घेतला असेल तर प्रत्येकवेळी मुलगीच दोषी असते असे नाही ना ? नवऱ्याचा स्वभावही डॉमिनेटिंग असू शकतो, तापट, हेकेखोर, सासरची इतर मंडळीही त्यासाठी कारणीभूत असू शकतात. आई..वडिलांच्या अति आज्ञेत राहणारा, त्यांच्या सांगण्यावरून तिच्याशी मनमानी वागणारा नवराही याला कारणीभूत असूच शकतो . अशा मुलीची चौकशी करून जर लग्नगाठ बांधली तर दोघांनाच्याही आयुष्याचे सोनेच होईल.

हल्लीच्या गुन्हेगारी प्रवृत्ती वाढण्याला, महिलांवर होणाऱ्या अतिप्रसंगाना एकप्रकारे वेळेवर मुलांची लग्न न होणे ही गंभीर समस्याच कारणीभूत आहे. तरुण वयात पोटाच्या भूकेबरोबरच शरीराचीही भूक भागणे गरजेचे असते. तिचा प्रक्षोभ झाल्यामुळे असे गुन्हे वाढत चाललेले दिसत आहेत. एकदा पोट भरल्यावर मग पुढ्यात अगदी पंचपक्वांन्नाचे ताट आले तरी पहावेसे सुद्धा वाटत नाही. तसेच शारीरिक भूकेचेही असते हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

योग्य वयात प्रसंगी आपल्या अटी , अपेक्षांना थोडीशी मुरड घालुन थोडीशी तडजोड करून मुलामुलींची लग्ने लावावीत हाच या गंभीर समस्येवरील उपाय ठरेल असे मला वाटते. समस्या तर प्रत्येक गोष्टीत असतातच पण त्यातून वेळच्यावेळी ती ओळखून ती दूर करण्यासाठी प्रयत्नसुद्धा आपणच करायला हवेत नाही का ?

**- सौ.स्नेहा मुसरीफ, पुणे**







## विंचूरचे सुनील क्षिरसागर यांना 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' प्रदान



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील विंचूर येथील पत्रकार सुनील क्षिरसागर यांना त्यांच्या पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल दै.अक्षराज मीडिया परिवाराचे मुख्य संपादक विनोदजी गोरे व सह संपादिका प्राजक्ता गोरे यांच्याकडून दै.अक्षराजच्या वर्धापन दिनानिमित्त यंदाचा उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार गुरुवार, दि.१४ ऑगस्ट २०२५ रोजी पोलीस निरीक्षक नवनाथ मदने, झोपडपट्टी सूरक्षा दलाचे संस्थापक अध्यक्ष भगवानराव वैराट व पुणे येथील सुप्रसिद्ध कवी हेमंत मुसरीफ या मान्यवरांच्या हस्ते देवाची आळंदी येथे प्रदान करण्यात आला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण, समाजाभिमुख आणि तथ्यपूर्ण पत्रकारितेची दखल घेत ही निवड करण्यात आली आहे.

पत्रकार क्षिरसागर हे गेल्या अकरा वर्षांपासून स्थानिक स्तरावर पत्रकारिता करत असून, सामाजिक प्रश्न, प्रशासनाच्या कार्यपद्धती तसेच ग्रामीण जीवनातील विविध पैलूंना वाचा फोडण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या लिखाणातून ग्रामीण जनतेचे प्रश्न नेहमीच प्रभावीपणे मांडले गेले असून, प्रशासनालाही जागे करण्याचे कार्य त्यांनी दै.अक्षराज वृत्तपत्रातून बातम्या छापून वेळोवेळी केले आहे.

उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान समारंभ श्री क्षेत्र देवाची आळंदी येथे पार पडला असून, अनेक मान्यवरांच्या व अक्षराज समूहाच्या उपस्थितीत हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. त्यांच्या या यशामुळे विंचूर परिसरात आनंदाचे वातावरण असून, विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# महिला व मुलींवर होणारे अत्याचार कसे रोखावे?



आजच्या प्रगत आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगातही महिला व मुलींवर होणाऱ्या अत्याचारांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच आहे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

बलात्कार, लैंगिक छळ, हुंडाबळी, बालविवाह, ऑनलाईन शोषण, छेडछाड, मानवी तस्करी, अशा अनेक प्रकारांनी मुली व महिला आजही असुरक्षित आहेत. या पार्श्वभूमीवर, हे अत्याचार रोखण्यासाठी सर्व पातळीवर जागरूकता, कणखर उपाययोजना आणि सामाजिक बदल आवश्यक आहेत.

**१. कुटुंबातून सुरुवात :** कोणतीही सामाजिक घडामोड बदलण्यासाठी घर ही पहिली शाळा असते. पालकांनी आपल्या मुलांना लहानपणापासूनच स्त्रियांबद्दल आदर, समानतेची भावना व योग्य वर्तन शिकवणे गरजेचे आहे. मुलींनाही आत्मसन्मान, स्वतःचे रक्षण कसे करावे, हे शिकवले पाहिजे.

**२. शिक्षण व स्वावलंबन :** स्त्री शिक्षण हा अत्याचारविरुद्धचा सर्वात प्रभावी उपाय आहे. शिकलेली, आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र महिला स्वतःच्या हक्कांसाठी उभी राहू शकते. त्यामुळे प्रत्येक मुलीला शिक्षणाच्या संधी मिळाव्यात हे समाजाचे व सरकारचे कर्तव्य आहे.

**३. कायद्यांची अंमलबजावणी व कठोर शिक्षा :** बलात्कार व छळाच्या घटनांमध्ये त्वरित न्याय व कठोर शिक्षा झाली पाहिजे. महिलांसंबंधी असलेले कायदे प्रभावीपणे लागू केले गेले पाहिजेत. पोलिस, न्यायालये आणि प्रशासन यांची संवेदनशीलता आणि तत्परता यामध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे.

**४. त्वरित मदतीसाठी यंत्रणा :** महिलांसाठी २४७ हेल्पलाईन, मोबाईल ॲप्स, सुरक्षिततेच्या सुविधा, सेल्फ डिफेन्सचे प्रशिक्षण, सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही, महिलांसाठी विशेष पोलीस पथके हे सर्व उपाय अत्यंत आवश्यक आहेत.

**५. समाजिक जागरूकता व लोकसहभाग :** मुलींवर अत्याचार होताना बघून गप्प बसणे हेही गुन्ह्याला साथ देणेच आहे. समाजाने जागरूक राहून अशा घटनांचा निषेध करणे, पीडितेला आधार देणे व गुन्हेगारांना उघड करणे आवश्यक आहे. मीडिया, समाजसेवी संस्था, शाळा, महाविद्यालये यांना या लढ्यात महत्त्वाची भूमिका निभवावी लागेल.

**६. डिजिटल सुरक्षिततेकडे लक्ष :** ऑनलाईन ट्रोलिंग, अश्लील मेसेजेस, ब्लॅकमेलिंग यापासून महिलांचे रक्षण करणे हे काळाची गरज आहे. सायबर क्राईम विभागाने तातडीने अशा केसेसवर कार्यवाही करावी.

महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी कायद्यापेक्षा मोठा शस्त्र म्हणजे मानसिकता बदलणे. जेव्हा प्रत्येक व्यक्ती स्त्रीला मान, संधी, सुरक्षितता देईल, तेव्हाच या देशात खऱ्या अर्थाने प्रगती होईल. यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे पावले उचलली पाहिजेत.

**: लेखिका :**
**सौ. प्रतिभा सुनील शेलार**
**संस्थापिका –**
**महालक्ष्मी आधार फाउंडेशन**

# 'चमको' नेत्यांमुळे ग्रामीण भागात विकासाला खीळ?

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, अहिल्यानगर :** महात्मा गांधींनी तर खेड्यांकडे चला असं सांगितलं होतं. कारण, त्यांना वाटत होतं की, खेड्यांचा विकास झाला की देशाचाही विकास होईल. स्वातंत्र्यापासून आजपर्यंत केंद्र आणि राज्य सरकारांनी ग्रामीण विकासावर खूप भर दिलाय. हजारो कोटींचा निधी ग्रामीण भागातील लोकांचं जीवनमान सुधारण्यासाठी दिला जातो. पण, तरीही अनेक गावांमध्ये 'गावचा विकास भकास झालाय' आणि याला कारण आहे गावातील 'चमको' नेतृत्व. आजही अनेक गावं विकासाच्या प्रतीक्षेत आहेत, हजारो कोटींचा निधी येत असूनही, गावांचा सर्वांगीण विकास झाला आहे का? हा प्रश्न तपासावा लागण्याची गरज आहे. निवडणुका जवळ आल्या की प्रत्येक पक्षाचा कार्यकर्ता आणि गावनेता गल्लोगल्ली जाऊन नागरिकांच्या समस्या विचारतो. पण, निवडणुका संपल्या की हे 'चमको' नेते गायब होतात.

पावसाळ्यातल्या भूछत्रीप्रमाणे गावागावांत असे चमको नेते मोठ्या संख्येने दिसू लागले आहेत. अनेक गावांमध्ये कार्यकर्त्यांपेक्षा नेते जास्त अशी अवस्था झाली आहे. काही गावांत तर सहा-सात पक्षांचे नेते आणि त्यांचे पदाधिकारी कार्यकर्ते मिळवण्यासाठी जीवघेणी स्पर्धा करतात.

त्यामुळे नेत्यांप्रमाणेच कार्यकर्तेही सकाळी एका पक्षात, दुपारी दुसर्या पक्षात, तर संध्याकाळी तिसर्याच पक्षात सक्रिय असतात. यामुळे कित्येक गावांतील गावकर्यांना 'गावनेते विकणे आहे' अशी जाहिरात द्यावी की काय? अशा चर्चा गावात ऐकायला मिळते. मध्यंतरी लोकसभा आणि त्यानंतर विधानसभा निवडणुका झाल्या.

त्यांचा धुरळा खाली बसतो न बसतो तोच, येत्या काही महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींचे वारे वाहू लागले आहे. त्यामुळे प्रत्येक गावातील दादा,भाऊ, अण्णा, आप्पा, तात्या,शेठ, साहेब अशा अनेक नेत्यांचे चमको चले आमच्याच दादांची, आप्पांची, आणणांची, भाऊंची कशी चलती आहे, हे सांगण्यात रक्ताचे पाणी करीत आहेत.

एखाद्या सर्वसामान्य नागरिकाकडे कधी ढुंकूनही न पाहणारे हे नेते निवडणूक जवळ आली की त्यांच्या खांद्यावर हात टाकून काय हवं नको ते विचारतात. कधीकाळी आज्या - पंज्यांच्या काळात तुमच्या घरावर आमच्या घरचे कसे उपकार आहेत, हे पटवून देतात आणि सरतेशेवटी मतदान करण्यासाठी गुलाल,भंडारा, बुक्का, गळ्यातील देवाचा ताईत, दोरी असे नाना हातखंडे वापरून भावनिक दबाव टाकतात. त्यामुळे निवडणुका आल्या की या नेत्यांमुळे गावकऱ्यांना भीक नको; पण कुत्रा आवर अशी म्हणण्याची वेळ येते.

# मराठीत बोला, मराठीच वाचा... ...आणि मराठीतच लिहा !

मराठी माणूस आणि मराठी भाषा ह्याचा माझ्या वाचनात आल्यानुसार कित्येक हजार वर्षाचा इतिहास आहे नव्हे इतिहासात फार मौलाचा वाटा आहे पण आज मराठी भाषा आपल्याच मातृभुमीत महाराष्ट्रात पोरकी झाल्यासारखी झाली आहे व इंग्रजी भाषा वरचढ होऊ पाहात आहे या सगळ्याला काही अंशी मराठी माणुसच जबाबदार आहे. सकाळी दारावरची घंटी वा कडी वाजल्यावर भाभी दूध असा आवाज येतो व आपल्या घरातून ही आती हु भैयाजी असा आवाज येतो अशी मराठी माणसाची सकाळ होते. मग त्यात घरात गाणीही हिन्दी-इंग्रजी मध्ये लागतात मग प्रवास सुरू होतो. त्यातही ओ रिक्षावाले-टैक्सीवाले भैयाजी एवढच काय बसमध्ये मराठी बस वाहक मराठी असुनही मराठी माणसेच तिकीट हिन्दीतुन मागतात रेल्वेत तर आता मराठी आवाज ऐकायला कान तरसल्यासारखे वाटतात रेल्वेत तर कळत ही नाही आपण मराठी माणूस सोडलो तर इतर ही कोणी तिथे मराठी आहे की नाही एवढी वाईट अवस्था मराठी माणूस व मराठी भाषेची झाली आहे. पण त्याच रेल्वेत एक गोष्ट प्रत्यक्षाने पाहायला मिळते ती दोन गुजराती- कानडी - मद्रासी जर बोलत असले तर ते त्याच्याच मातृभाषेत बोलत असतात त्याच्या बोलण्यात जरा ही हिन्दी इंग्रजीचा प्रभावच काय शब्द ही दिसत नाही. हिच प्रवृती हिन्दी भाषिकात ही पाहायला मिळते. पण जर का दोन मराठी एकत्र भेटले तर हाय, हॅलो, अरे, किधर था यार इतने दिन अशी समीश्र भाषा हिन्दी - इंग्रजीतून चालू राहते. आणी अशाच आपल्या मराठी महाभागामुळे आपली मातृभाषा मागे पडत आहे. बहुताश गुजराती वर्ग गुजराती वर्तमान पत्र घेतो तर मद्रासी कानडी त्याच्या भाषेतील घेतो. पण मराठी माणसावर जे इंग्रजीचे भूत बसले आहे. त्यांच्या हातात कायम इंग्रजी वर्तमानपत्र दिसते त्यापेक्षा जास्त दुर्भाग्य ते काय असणार मराठी भाषेचे आता ही परिस्थिती बदलायला पाहिजे मराठी माणसाच्या हातातच नव्हे तर घराघरात मराठी वर्तमानपत्र आलेच पाहिजे आणि मराठीतच बोलणे वाचणे लिहीणे हे झाले पाहिजे.

आता मुलाना शाळेत ही घालताना मुलाचे पालक इंग्रजी माध्यमच पर्याय निवडतात. त्यामुळे कित्येक मराठी शाळा वर बंद होण्याची पाळी आली आहे. आपण आपल्या मातृभाषेत शिक्षण ही घ्यायला तयार नाही तर आपली मराठी भाषा वाढणार तरी कशी आपण जर मुळच कापली तर रोपाचे झाड व झाडाचे वृक्ष निर्माण कसे होणार ती वाढणार कशी पुढच्या पीढीची सुरवातच जर इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेऊन होणार तर त्यांना आपल्या मातृभाषे बद्दल काय समजणार व तिचा अभिमान तरी कसा राहणार महाविद्यालयीन मुळे तर एकत्र भेटल्यावर हिन्दी - इंग्रजी शिवाय बोलायलाच बघत नाही त्याना पाहून तर असे वाटते त्याना मराठी बोलायची जणू लाजच वाटू लागली आहे की काय आपली पुढची पीढी शाळा व महाविद्यालयीन मुले हीच आपल्या भाषेचा पाया कमकुवत करताना दिसत आहेत ह्या साठी प्रथम मराठी शाळा सुरू राहील्या पाहीजेत कारण मराठी शाळा राहील्या तर मराठी भाषा राहणार मराठी माणूस आणि संस्कृती जपली जाणार मी शिक्षणातील कोणी फार मोठा तज्ञ नाही पण इंग्रजी शाळेचे वाढते भुत पालकांना झपाटत आहे ह्याला काही अंशी आपली शिक्षण पध्दतीच जवाबदार वाटते समोरच्याचा मुल इग्रंजी शाळेत तर माझेच का मराठी शाळेत जाणार असे पालकाचे ठाम मत आहे त्यात अभ्यासक्रमात ही बराच बदल जाणवतो आणि आतातर अनेक वेगवेगळे पुणे दिल्ली असे बरेच अभ्यासक्रम सुरू झाले आहेत आपल्या महाराष्ट्रात तरी एकच शिक्षण पध्दती सुरू झाली पाहिजे महाराष्ट्राची मातृभाषा मराठी म्हणजे एक विषय मराठी आणि तोही महाराष्ट्राचा इतिहास मराठीतून शिकवला पाहिजे नंतर आपली व्यव्हारी भाषा हिंदी जीच्यामुळे आपण हिन्दुस्तानातील विविध राज्यातील लोकांशी बोलू शकतो संपर्क ठेवू शकतो म्हणजे भुगोल विषय हिंदीतुन शिकु शकतो आणि नंतर आली आपली व्यापारी भाषा परदेशी भाषा इंग्रजी जीचा वापर आपण आपल्या देशाबाहेर करु शकतो जी पहिली ते तिसरी पर्यंत शिकऊ शकतो तर काही मुले पहीलीतच शिकतात आणि त्या इंग्रजी भाषेत विज्ञान आणि गणित हे विषय शिकवले तर त्याचा शालेय मुलांना जास्त फायदा होईल आणि हिच शिक्षण पध्दती महाराष्ट्रातील सगळ्या शाळात वापरली तर इंग्रजी शाळेचे वाढते प्रस्थ रोखले जाईल आणि मराठी शाळांना ही न्याय मिळेल सगळ्या मुलांना एकच शिक्षण पध्दती शिकवल्याने सगळ्या मुलांना समान शिक्षण मिळेल आणि मग माझा मुलगा इंग्रजीत की मराठीत शिक्षण घेणार हा मुद्दाच राहणार नाही ह्या साठी सर्व प्रथम महाराष्ट्रात समान शिक्षणपद्धती आणली पाहिजे. नाहीतर मराठी भाषेची अशी वाईट परिस्थिती येईल की मराठी भाषा ही फक्त शाळेत फक्त एक विषय शिकवायचा म्हणून शिकवली जाईल व मुले जसे इतर विषय शिक्षण पूर्ण झाल्यावर विसरतात तसे विसरून जातील व आपली मातृभाषा हे आपले मूळ आहे ती सपली की आपला इतिहास आपली संस्कृती ही सपल्या सारखी आहे. जवळ-जवळ आपणच मराठी भाषा मागे पाडल्यासारखे आहे. यासाठी आपण एक प्रतिज्ञा करूया मराठी भाषेला वाचवायची सुरवात स्व:तापासून प्रथम करूया मराठीत बोलणे, मराठीच वाचणे आणि मराठीतच लिहीणे.

**- मानसी मयुर ढोलम**
**जोगेश्वरी पुर्व मुंबई**
**८७७९९४७२९९**






































## वैवाहिक वादातून महिलेचा टोकाचा निर्णय

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, पुणे :** वैवाहिक वादातून मानसिक तणावात असलेल्या महिलेने सोमवारी (११ ऑगस्ट) रात्री कालव्यात उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला. पर्वती दर्शन पोलिस चौकीतील बीट मार्शल किरण पवार आणि राहुल उनाळे यांच्या धाडसी कृतीमुळे तिचा जीव वाचला. वेगाने वाहणारे पाणी आणि रात्रीच्या दाट अंधारात पवार यांनी कालव्यात उडी मारून सहकाऱ्याच्या मदतीने महिलेला सुखरूप बाहेर काढले. ही घटना सोमवारी रात्री साडेअकराच्या सारसबागेजवळील सावरकर चौक येथे घडली. प्राथमिक चौकशीत नवरा-बायकोच्या वादातून व मानसिक तणावातून महिलेने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे उघड झाले आहे. पोलिसांनी संपूर्ण घटनेचे व्हिडिओ चित्रण पुराव्यासाठी जतन केले आहे. पोलिसांच्या या तत्पर व धाडसी कृतीचे स्थानिकांनी कौतुक केले.


**पाहिजेत !!** राजेंद्र कुमार : ९४२२६७५१६४

एखादे कुटुंब हवे आहे, जे शेती काम करतील. माझ्या घरातील व शेतीवरील कामात caretaker म्हणून काम पाहतील.

**प्रथम पगार रुपये ८,०००/- ते रुपये १५,०००/- प्रतिमाह**

**एका मुलाचा शालेय शिक्षण खर्च समाविष्ट**

गाईचा गोठा सर्व कामे : दूध काढणे, चारा देणे, गोठ्यात इतर कामे...

शेतीवरील काम : शेतीवरील कामात लक्ष देणे, पाणी पंप सुरू करणे व शेताला पाणी पुरवठा करणे, माणसे काम करतील ते पाहणे व ईतर काही कामे.

**राहण्याची सोय आहे... ५ वर्षे करार असेल...**

**गाव : लोणविरे तालुका : सांगोला जिल्हा : सोलापूर**




































# ‘दैनिक अक्षराज’ चे पत्रकार वसंत रांधवण आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१४, अहिल्यानगर :**

जिल्ह्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल रहिवाशी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पारनेर तालुका उपाध्यक्ष पत्रकार वसंत रांधवण यांना राज्यातील दैनिक अक्षराज मिडिया समुहाच्या वतीने आदर्श पत्रकार पुरस्काराने म्हणून अक्षराज मिडिया समुहाचे मुख्य संपादक विनोद गोरे व सहसंपादिका प्राजक्ता गोरे-चव्हाण यांच्या हस्ते सन्मानित आले.

गुरूवार दि. १४ ऑगस्ट रोजी आळंदी देवाची (पुणे) येथील हॉटेल आराधना येथे वर्धापनदिन सोहळा संपन्न झाला. यावेळी पुणे ग्रामीणचे पोलीस निरीक्षक नवनाथ मदने, झोपडपट्टी सुरक्षा दलाचे संस्थापक अध्यक्ष भगवानराव वैराट व पुणे येथील सुप्रसिध्द कवी हेमंत मुसाफिर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले. त्याचप्रमाणे राज्यातून विविध विभागातून आलेले अक्षराज मिडिया परिवाराचे पत्रकार सदस्य उपस्थित होते.



वसंत रांधवण हे गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तसेच अक्षराज मिडियाच्या माध्यमातून अहिल्यानगरसह पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील पत्रकार असून निर्भिडपणे ग्रामीण भागातील प्रश्न मांडण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहे, सामाजिक प्रश्न, कृषी विषयक प्रश्न, ग्रामीण भागातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी रांधवण यांनी सातत्याने मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या लिखाणातून जनतेचे प्रश्न नेहमीच प्रभावीपणे मांडले आहेत. प्रशासनाला जागे करण्याचे कार्य त्यांनी दैनिक अक्षराज मिडियाच्या माध्यमातून वेळोवेळी केले आहे. त्यामुळेच रांधवण यांना आदर्श पत्रकार पुरस्काराने गौरविण्यात आले.

पुरस्कार मिळाल्याबद्दल खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ,आम्ही टाकळीकर ग्राम विकास प्रतिष्ठान, खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, पारनेर तालुक्यातील समता सैनिक व टाकळी ढोकेश्वर परिसरासह तसेच पारनेर तालुक्यातील राज्य पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी व विविध क्षेत्रातून पत्रकार रांधवण यांचे अभिनंदन होत आहे.



# संत ज्ञानेश्वर माऊली महाराज (जन्माष्टमी)

श्रावण वद्य अष्टमी हा भगवान श्रीकृष्णाचा जन्मदिवस तसेच संत ज्ञानेश्वरांचा ही जन्म दिवस असतो. त्यांचा जन्म याच शुभ दिवशी झाला होता. संत ज्ञानेश्वर महाराज हे १३ व्या शतकातील वारकरी संप्रदायातील एक महत्त्वपूर्ण संत होते. ज्यांनी भगवद्गीतेवरील आपले भाष्य म्हणजेच 'ज्ञानेश्वरी' हे मराठीत लिहिले.

भगवान गोपाळकृष्णाने अर्जुनाच्या माध्यमातून अखिल विश्वाला गीतामृत पाजले तर संत ज्ञानेश्वरांनी तेच गीतामृत सर्वसामान्य जनाला ज्ञानामृत पाजले. विविध दृष्टांत देत भगवद्गीता प्राकृत मराठी भाषेत ओवीबद्ध करून ज्ञानेश्वरी स्वरूपात मांडली. एवढेच नाही तर ज्ञानेश्वरांनी विश्वकल्याणासाठी विश्वात्मक देवाकडे **'पसायदान'** मागितले.

संत ज्ञानेश्वर (जन्म : इ.स. १२७५ – समाधी : इ.स. १२९६) हे १३ व्या शतकातील प्रसिद्ध मराठी संत आणि कवी होते.ज्ञानेश्वरांचा जन्मआपेगावयेथे बाराव्या शतकात, मध्यरात्री श्रावण कृष्ण अष्टमी, शके ११९७ (इ.स. १२७५) रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत कुलकर्णी. त्यांच्या आई रुक्मिणीबाई या होत. गोविंदपंत व मीराबाई हे त्यांचे आजोबा–आजी होते. निवृत्तिनाथहे ज्ञानेश्वरांचे थोरले बंधू वसोपानदेववमुक्ताबाईही धाकटी भावंडे. आपेगावहे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातीलपैठण जवळगोदावरी नदीच्याकाठावर वसलेले छोटे गाव आहे. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे मुळात विरक्त संन्यासी होते. विवाहित असतानाच त्यांनी संन्यास घेतला व ते काशीला गेले. गुरूंना ते विवाहित असल्याचे समजल्यावर गुरूंनी त्यांना परत पाठवले. त्यांच्या आज्ञेनुसार पुन्हा गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यानंतर विठ्ठलपंतांना ४ अपत्ये झाली. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई अशी त्यांची नावे होती. विठ्ठलपंत तीर्थयात्रा करत आळंदी मुक्कामी येऊन स्थायिक झाले. त्या काळी संन्यास्याची मुले म्हणून सर्व समाज या चौघा भावंडांची हेटाळणी करीत असे. गावाने त्यांना व त्यांच्या कुटुंबाला वाळीत टाकले. परित्यक्त ब्राह्मण म्हणून त्यांना काळ कंठावा लागला. ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांची मुंज करण्याचे आळंदीच्या ब्राह्मणांनी नाकारले. त्यावर विठ्ठलपंतांनी उपाय काय असे धर्मशास्त्रींना विचारले. त्यावर केवळ देहदंडाचीच शिक्षा आहे असे ब्राह्मणांनी सांगितले. मुले संस्कारांपासून वंचित राहू नये व त्यांचे भविष्यात भले व्हावे यासाठी विठ्ठलपंतानी व रुक्मिणीबाई यांनी आत्महत्या करून देहान्त प्रायश्चित्त घेतले. आई–वडिलांच्या मृत्यूनंतर ही ज्ञानेश्वरांना आणि त्यांच्या भावंडांना लोकांकडून फार त्रास दिला गेला. त्यांना अन्न आणि पाणी यासारख्या मूलभूत गोष्टी नाकारण्यात आल्या. पुढे ही भावंडे पैठणला गेले आणि त्यावेळी तेथे ज्ञानेश्वरांनी आपली विद्वत्ता सिद्ध केली. संत ज्ञानेश्वरांनी अत्यंत रसाळ भाषेत शब्दरचना केली आहे. भिक्षा मागून ते आपला जीवन निर्वाह करीत असत. भिक्षा मागणाऱ्या या भाऊ बहिणींची कुशाग्र बुद्धी व शास्त्र ज्ञान पाहून पैठणमधील ब्राह्मण दुःखी होत असत. त्यांनी विचार केला की, आईवडिलांच्या अपराधाचे दंड मुलांना देणे अन्याय पूर्ण आहे. शेवटी १२८८ साली पैठण मधील ब्राह्मणांनी चारही भाऊ बहिणींना शुद्ध करून पुनः समाजात सम्मिलित केले.

## ज्ञानेश्वरांचा प्रवास आणि समाधी –




ज्ञानेश्वरांनी अमृतानुभव लिहिल्यानंतर ही भावंडे पंढरपूरला गेली. तिथे त्यांची भेटनामदेवांशी झाली, जे ज्ञानेश्वरांचे जवळचे मित्र बनले. ज्ञानेश्वर आणि नामदेव यांनी भारत भरातील विविध पवित्र तीर्थक्षेत्रांची यात्रा केली आणि तिथे त्यांनी अनेक लोकांना वारकरी संप्रदायात दीक्षा दिली. ज्ञानेश्वरांच्याअभंगनावाच्या भक्ती रचना याच काळात रचल्या गेल्या असे मानले जाते.पंढरपूरला परतल्यावर, ज्ञानेश्वर आणि नामदेव यांना मेजवानी देऊन सन्मानित करण्यात आले, ज्यामध्ये बहिरात यांच्यानुसार, गोरोबा कुंभार, सावता माळी, अस्पृश्य असलेले संत चोखोबाआणि पारिसा (भागवत ब्राह्मण) यांसारखे अनेक समकालीन संत सहभागी झाले होते. काही विद्वान नामदेव आणि ज्ञानेश्वर हे समकालीन होते असे पारंपारिक मत मान्य करतात; तथापि डब्ल्यू.बी. पटवर्धन, आर. जी. भांडारकर आणि आर. भारद्वाज यांसारखे इतर लोक या मताशी असहमत आहेत आणि त्याऐवजी नामदेव १४ व्या शतकाच्या उत्तरार्धातील होते, असे ते मानतात. ज्ञानेश्वरांनी संजीवन समाधीमध्ये जाण्याची इच्छा व्यक्त केली. ही प्राचीन भारतातील अष्टांग योगामध्ये प्रचलित केलेली, खोलध्यानस्थ अवस्थेत प्रवेश केल्यानंतर स्वेच्छेने नश्वर शरीर सोडण्याची प्रथा होती.संजीवनसमाधीची तयारी नामदेवांच्या मुलांनी केली. संजीवन समाधीबद्दल, ज्ञानेश्वरांनी स्वतः उच्च जागरूकता आणि विद्युत चुंबकीय किरणोत्सर्गाच्या रूपात प्रकाश किंवा शुद्ध ऊर्जा यांच्यातील संबंधांबद्दल जोरदारपणे सांगितले आहे.

**हिंदू कॅलेंडरच्या कार्तिक महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या १३ व्या दिवशी, आळंदी येथे ज्ञानेश्वर महाराजांनी तेव्हा २१ वर्षांचे असताना संजीवन समाधीत प्रवेश केला.** त्यांची समाधी आळंदीतील सिद्धेश्वर मंदिर परिसरात आहे. त्यांच्या संजीवन समाधीने नामदेव आणि इतर उपस्थितांनी शोक केला. परंपरेनुसार, ज्ञानेश्वरांना भेटण्यासाठी नामदेवांनी नंतरविठोबाकडेपरत त्यांना परत आणण्यासाठी प्रार्थना केली होती. **डॅलमायर लिहितात की, हे खऱ्या मैत्रीच्या अमरत्वाची आणि उदात्त आणि प्रेमळ अंतःकरणाच्या सहवासाची साक्ष देते.** अनेक वारकरी भक्तांचा असा विश्वास आहे की, ज्ञानेश्वर महाराज हे अजूनही जिवंत आहेत.

## चमत्कार



### रेड्या मुखी वेद :–

ज्ञानेश्वरांच्या जीवनाशी अनेक चमत्कार जोडले गेले आहेत. त्यापैकी एक म्हणजे त्यांचे शिष्य सच्चिदानंद यांच्या प्रेताचे पुनरुज्जीवन. फ्रेड डॅल्मीर यांनी महिपतीच्या हगिओग्राफीमधून खालीलप्रमाणे यातील एका दंतकथेचा सारांश दिला आहे. वयाच्या १२ व्या वर्षी, ज्ञानेश्वर आपल्या गरीब आणि बहिष्कृत भावंडांसोबत पैठणच्या पुजाऱ्यांकडे दयेची याचना करण्यासाठी पैठणला गेले. तेथे त्यांचा अपमान व विटंबना करण्यात आली. या मुलांना गुंडगिरीचा त्रास होत असताना जवळच्या रस्त्यावर एक माणूस म्हाताऱ्या म्हशीला हिंसकपणे मारहाण करत होता. यामध्ये ती जखमी म्हैस रडून रडून खाली कोसळली. ज्ञानेश्वरांनी त्या माणसाला म्हशीच्या काळजीपोटी थांबायला सांगितले. एका पशूबद्दल अति काळजी असण्यासाठी आणि वेदांच्या शिकवणींबद्दल बेफिकीर असल्यासाठी ब्राह्मणांनी ज्ञानेश्वरांची थट्टा केली. ज्ञानेश्वरांनी प्रतिवाद केला की खुद्द वेदांनीच सर्वच जीवन पवित्र आणि ब्रह्माचे प्रकटीकरण मानले आहे. संतप्त पुरोहितांनी निदर्शनास आणून दिले की, ज्ञानेश्वरांचा तर्क असे सूचित करतो की प्राण्यांनाही वेद शिकता आले पाहिजेत. निश्चल ज्ञानेश्वरांनी मग म्हशीच्या कपाळावर हात ठेवला आणि ती म्हैस खोल आवाजात वेद म्हणू लागली. **फ्रेड डॅलमायर यांच्या मते, ही कथा ज्ञानेश्वरांच्या चरित्राचे अचूक प्रतिबिंबित करते की नाही, याविषयी चिंता नसावी. मॅथ्यू ३:९ मधील जेरुसलेममधील येशूच्या कथेप्रमाणेच या कथेचे प्रतीकात्मक महत्त्व फार मोठे आहे.**

### चांगदेवाला भिंत चालवून भेटणे :–



चांगदेवांना सामोरे जाण्यासाठी ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली, हा एक प्रसिद्ध चमत्कार आहे, जो त्यांची अलौकिक शक्ती दर्शवतो.नंतर चांगदेव हे ज्ञानेश्वरांची बहीण मुक्ताबाई यांचे शिष्य बनले.

## ज्ञानेश्वरांचे कार्य



ज्ञानेश्वरांचे मोठे बंधू संतनिवृत्तीनाथहेच त्यांचे सद्गुरू होते. नेवासाक्षेत्रात आपल्या गुरूंच्या कृपाशीर्वादाने गीतेवर त्यांनी प्रख्यात टीका लिहिली. खरे पाहता ज्ञानेश्वरांनी ही टीका सांगितली वसच्चिदानंद बाबायांनी ती लिहिली. या ग्रंथास **'ज्ञानेश्वरी'** किंवा **'भावार्थदीपिका'** असे म्हणतात. हे मराठी वाङ्मयाचे देशीकार लेणे झाले. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून संस्कृत भाषेतील 'ज्ञान', श्री संत ज्ञानेश्वरांनी प्राकृत भाषेत आणले.

माझा मराठाचि बोलू कौतुके।
परि अमृतातेहि पैजासी जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।। (
ज्ञाने – ६.१४) असे म्हणत त्यांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान, मराठीची महती व्यक्त केली आहे.

कर्मयोग, ज्ञानयोगव भक्तियोग सांगणाऱ्या ज्ञानेश्वरीत सुमारे ९००० ओव्या आहेत. हा ग्रंथ इ.स. १२९० मध्ये लिहिला गेल्याचे मानले जाते. त्यांचा दुसरा ग्रंथ 'अनुभवामृत' किंवा 'अमृतानुभव' होय. हा विशुद्ध तत्त्वज्ञानाचा, जीव–ब्रह्म ऐक्याचा ग्रंथ आहे. सुमारे ८०० ओव्या (१० प्रकरणे) या ग्रंथात आहेत. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने हा श्रेष्ठ ग्रंथ आहे. **'चांगदेव पासष्टी'** या ग्रंथाद्वारे त्यांनी चांगदेवांचे गर्वहरण करून त्यांना उपदेश केला. चांगदेवहे महान योगी १४०० वर्षे जगले असे मानले जाते. पण त्यांचा अहंकार गेला नव्हता. यासाठी संत ज्ञानेश्वरांनी उपदेशपर लिहिलेले ६५ ओव्यांचे पत्र म्हणजे चांगदेव पासष्टी हा ग्रंथ होय. यात अद्वैत सिद्धान्ताचे अप्रतिम दर्शन आहे. संत ज्ञानेश्वरांचा **'हरिपाठ'** (अभंगात्मक,२८ अभंग) हा नामपाठ आहे. यात हरिनामाचे महत्त्व सांगितले आहे. 'अमृतानुभव' या ग्रंथाच्या लेखनानंतर संत ज्ञानेश्वरांनी तीर्थयात्रा केली. संत नामदेव महाराजांच्या 'तीर्थावली' मध्ये या तीर्थयात्रेचा उल्लेख आढळतो. या यात्रेनंतर ज्ञानेश्वर माउलींनी समाधी घेण्याचा निर्णय घेतला. संत नामदेवांच्या'समाधीच्या अभंगां'मध्ये तत्कालीन संदर्भ सापडतात. अन्य संतांची मानसिक स्थिती, त्यांच्यासह समाजाला झालेले दुःख, खुद्द नामदेव महाराजांच्या वेदना, ज्ञानेश्वरांचा संयम आणि निग्रह – या सर्व गोष्टींचे प्रतिबिंब समाधीच्या अभंगांत आढळते.'जो जे वांछील, तो ते लाहो' असे म्हणत अखिल विश्वाची जणू काळजी वाहणाऱ्या संत ज्ञानेश्वरांनावारकरीसंप्रदायासह सर्वच भक्त प्रेमाने 'माउली' म्हणतात. त्यांनी धर्मातील क्लिष्ट अवडंबरे काढून धर्माला कर्तव्याचा वेगळा अर्थ दिला. वायय निर्मितीबरोबरच त्यांनी आध्यात्मिक लोकशाहीचे बीज रोवण्याचा यशस्वी प्रयत्न चंद्रभागेच्या वाळवंटात केला. भागवत धर्माचा तथावारकरी संप्रदायाचापाया रचण्याचे अभूतपूर्व कार्य त्यांनी केले. संत नामदेव, संतगोरा कुंभार, संत सावता माळी, या समकालीन संत प्रभावळीचे अनौपचारिक नेतृत्व करत, संत ज्ञानेश्वरांनी अध्यात्माच्या क्षेत्रात समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. ज्ञानेश्वर महाराजांनी भगवद् गीता मराठीतून लिहिली.

## संजीवन समाधी

संतवर्य ज्ञानदेवांनी वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी, आळंदी येथे इंद्रायणी नदीच्या काठी संजीवन समाधी घेतली. (कार्तिक वद्य



त्रयोदशी, शके १२१८,

दुर्मुखनाम संवत्सर, इ.स.१२९६, गुरुवार). हा 'ज्ञानसूर्य' मावळल्यानंतर अवघ्या वर्षभरात निवृत्ती, सोपान व मुक्ताबाई या त्यांच्या भावंडांनी आपआपली इहलोकीची यात्रा संपवली. इंद्रायणीच्या तीरावर आळंदीमध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी सोहळा कार्तिक वद्य षष्ठी ते अमावस्येपर्यंत साजरा केला जातो. यातील प्रत्येक दिवसाला आगळेवेगळे महत्त्व आहे.

## प्रभाव आणि वारसा



ज्ञानेश्वरांच्या जीवनातील आणि लेखनातील घटक, जसे की, त्यांनी पुरोहित वर्गाच्या संकोचवादावर केलेली टीका, कौटुंबिक जीवनात अडकून पडणे आणि आध्यात्मिक समतावाद यांनी वारकरी चळवळीच्या संस्कृतीला आकार दिला. **डल्लमायर यांच्या मते, ज्ञानेश्वरांचे जीवन आणि लेखन हे वारकरी चळवळीसाठी अस्सल धार्मिकतेचे प्राथमिक उदाहरण आहे.** तसेच भक्तीचा महत्त्वपूर्ण स्रोत आणि केंद्रबिंदू म्हणून विकसित झाले आहे. दरवर्षी आषाढ महिन्यामध्ये वारकरी संप्रदायाचे भक्त हे आळंदीतील ज्ञानेश्वरांच्या मंदिरापासून पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरापर्यंत होणाऱ्या वारी नावाच्या वार्षिक यात्रेत सामील होतात. या पालखीमध्ये ज्ञानेश्वरांच्या प्रतिकात्मक पादुका नेल्या जातात. ज्ञानेश्वरांच्या पादुका पालखीत नेल्यामुळे वारकरी चळवळीतील नंतरच्या कवी–संतांना त्यांच्या कलाकृतींसाठी प्रेरणा मिळाली. आषाढ महिन्यात आळंदी वरून दरवर्षी पंढरपूरकडे पालखीच प्रस्थान होत अनेक वर्षांपासून चालत आलेली प्रथा आहे. त्यावेळी मंदिराचा कळस हल्ल्याशिवाय माउलींच्या पालखीचं प्रस्थान होतं नाही.

# गोकुळाष्टमी

गोकुळाष्टमी, ज्याला जन्माष्टमी असेही म्हणतात, हा भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचा उत्सव साजरा करणारा एक महत्त्वाचा हिंदू सण आहे. भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षाच्या आठव्या दिवशी (अष्टमी) हा सण साजरा केला जातो. हा सण भगवान विष्णूचा आठवा अवतार मानल्या जाणाऱ्या भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचे स्मरण करतो. हा सण वाईटावर चांगल्याचा विजय आणि धार्मिकता आणि कर्तव्याचे महत्त्व लक्षात आणून देणारा आहे.

**उपवास आणि पूजा :** भगवान श्रीकृष्णाचे आशीर्वाद मिळविण्यासाठी भक्त उपवास करतात आणि पूजा करतात.

**दहीहंडी :** महाराष्ट्रातील एक लोकप्रिय परंपरा, जिथे तरुण पुरुष दह्याने भरलेले भांडे फोडण्यासाठी मानवी पिरॅमिड बनवतात, जे



भगवान श्रीकृष्णाच्या लोणीवरील प्रेमाचे प्रतीक आहे.

**भजन आणि कीर्तन :** भगवान श्रीकृष्णाची स्तुती करण्यासाठी भक्तीगीते गातात आणि कीर्तन करतात.

**सजावट :** घरे आणि मंदिरे फुले, दिवे आणि पारंपारिक दागिन्यांनी सजवली जातात.

पारंपारिक पदार्थ : भगवान श्रीकृष्णाला अर्पण करण्यासाठी माखन, मिश्री आणि इतर मिठाईसारखे विशेष पदार्थ तयार केले जातात.

**पाळणा सजवणे :** भगवान श्रीकृष्णाच्या मूर्तीसाठी फुले आणि दागिन्यांनी सजवलेला एक खास पाळणा तयार केला जातो.

**आध्यात्मिक महत्व :** गोकुळाष्टमी हा भगवान श्रीकृष्णाच्या दैवी प्रेमाचा आणि खेळकरपणाचा उत्सव आहे. हा उत्सव साधे आणि नीतिमान जीवन जगण्याचे महत्त्व आणि भक्ती आणि श्रद्धेचे महत्त्व याची आठवण करून देतो.

**श्री.भास्कर देवराव शिनगारे**
**मु.बेंद्री, ता.भोकर, जि.नांदेड**

# शाळा व्यवस्थापन समित्या कागदावरच पालकांनी सावध राहण्याची गरज

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.१४, अहिल्यानगर :**

शाळा व्यवस्थापन समिती ही शाळेच्या विकासाचा महत्त्वाचा दुवा असूनही, अनेक ठिकाणी ती केवळ कागदावरच अस्तित्वात असल्याचे चित्र आहे. समितीच्या सदस्यांना त्यांच्या अधिकारांची आणि जबाबदारीची पुरेशी माहिती नसल्याने, शाळेच्या विकासात त्यांचा सहभाग अत्यंत मर्यादित राहतो. निवडणुकीच्या वेळी सदस्य मोठ्या उत्साहाने पुढे येतात; मात्र निवडणुकीनंतर ते शाळेकडे पाठ फिरवतात. परिणामी, शाळेच्या मूलभूत सुविधा, विद्यार्थ्यांचे कल्याण आणि शैक्षणिक गुणवत्ता याकडे दुर्लक्ष होत आहे.

शाळा व्यवस्थापन समितीची रचना ही शासनाने ठरवलेल्या नियमांनुसार असते. समितीत १२ ते १६ सदस्यांचा समावेश असतो. त्यामध्ये ७५ टक्के सदस्य विद्यार्थी पालक असतात आणि त्यापैकी किमान ५० टक्के महिला असणे बंधनकारक असते. याशिवाय, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ञ यांचाही सहभाग




असतो. शाळेच्या विकासासाठी समितीला काही महत्त्वाच्या जबाबदा-या सोपवण्यात आल्या आहेत. शालेय विकास आराखडा तयार करणे, शाळेच्या खर्चावर देखरेख ठेवणे, शिक्षणाच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवणे, शाळेतील गैरप्रकार रोखणे आणि विद्यार्थी गळती कमी करण्यासाठी प्रयत्न करणे, या महत्त्वाच्या जबाबदा-या आहेत.

मात्र, प्रत्यक्षात समिती या गैरहजेरी, शुल्कासंबंधी तक्रारी, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचे मुद्दे हाताळणे. विद्यार्थी गळती कमी करण्यासाठी उपाय योजणे. या जबाबदा-या योग्यप्रकारे पार पाडते का, हा मोठा प्रश्नच आहे. समिती प्रभावीपणे कार्य नसल्याची तक्रार अनेक पालक आणि शिक्षकांनी केली जात आहे.

निवडणुकीच्या वेळी अनेक सदस्य मोठ्या जोमाने पुढे येतात. मात्र, निवडणुकीनंतर शाळेशी त्यांचा संपर्क तुटतो. समितीतील सदस्यांना शाळेच्या विकासाच्या दृष्टीने निर्णय घेण्याचे अधिकार असले, तरी त्यांची अंमलबजावणी होत नाही. निधी कसा खर्च होतो, याबाबत पालकांना कोणतीही माहिती दिली जात नाही. तसेच शिक्षक आणि समिती यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याने, अनेक महत्त्वाचे निर्णय फक्त चर्चेतच राहतात. समितीच्या सदस्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या आणि अधिकाराविषयी समजावून सांगणे गरजेचे आहे. तसेच, पालकांनीही शाळेच्या कामकाजात सक्रिय सहभाग घ्यायला हवा. शाळा व्यवस्थापन समित्या सक्षम झाल्यास स्थानिक पातळीवर शाळांच्या समस्या सुटण्यास मदत होईल. मात्र यासाठी समिती सदस्यांनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची गरज आहे, अन्यथा ही समिती केवळ कागदावरच राहील.

## रेसिपी

# चटपटीत क्रीस्पी फुले

बऱ्याच मुलांना खाण्याचे अजिबात वेड नसते. खाण्यासाठी सतत मागे लागावे लागते त्यांच्या. अशावेळी जर त्यांचे लक्ष वेधून घेण्यासारखे आकर्षक असे काही ना काही बनवून त्यांना दिले तर नक्कीच ते आवडीने खातात. हा अनुभव कितीतरी आयांना येत असतोच.

लांब कशाला, माझ्या मुलगा मंदारच्या बाबतीतही हा अनुभव आला आहे. अगदी रोजच्या पोळीचे सुद्धा कधी अइडू, कधी त्रिकोण,चौकोन, स्टार तर कधी प्राणी, पक्षी यांचे आकार केले की साधी पोळी सुद्धा त्याच्या नादाने जायची पोटात. त्यामुळे असे सतत काहीतरी नवीन बनवावे लागतेच तेही टेस्टी !आज आपण असाच एक पदार्थ बनवू. जो पाहून मुलेच काय, मोठ्यांना सुद्धा राहवणार नाही. उत्कंठा वाढली आहे ना? चला मग...



### साहित्य :–

अर्धी वाटी कणिक, अर्धी वाटी मैदा किंवा संपूर्ण कणिक वापरली तरी चालते, २ चमचे तांदुळाची पिठी किंवा कॉर्न फ्लोअर, खमंग करायचे असतील तर १ चमचा ओवा आणि पाव चमचा हिंग घालावा व चवीनुसार मीठ घालावे. आणि गोडाची फुले बनवायची असतील तर अगदी किंचीत चवीसाठी फक्त मीठ घालावे. २ चमचे गोड करताना तुपाचे मोहन घालावे, तिखट, मिठाचे करताना तेलाचे मोहन घालावे, वरून भूरभुरण्यासाठी तिखट, चाट मसाला.

### कृती :–

प्रथम एका मोठ्या बाऊलमध्ये कणिक, मैदा, पिठी, मिठ, दोन्ही हातांवर चोळून ओवा, हिंग, तेलाचे एकदम कडकडीत मोहन घालावे. नंतर लागेल तसे थोडे थोडे आणि घालत त्याचा घट्ट गोळा बनवून घ्यावा व तो १० मिनिटे घट्ट झाकून ठेवावा. नंतर तो पुन्हा छान मळून घेऊन तेलाचा हात लावून त्याचे पोळी सारखे उंडे करून पातळ पोळी लाटून घ्यावी. आता या पोळीच्या चारी बाजू सुरीने कापून मधला चौकोनी भाग ठेवावा. आता त्याच्या साधारण दीड ते दोन पेरा एवढ्या लांबट पट्ट्या कापून घ्याव्यात.

नंतर एकेक पट्टी घेऊन त्याची थोडी बाजू एकाबाजूने तशीच ठेवून बाकी पट्टीला शक्य तितक्या जवळ जवळ सुरीने कट द्यावेत. सजावटीच्या झिरमिळ्या बनवतो. त्याप्रमाणे बनवून त्याला गोल वेटोळे देऊन घट्ट रोल बनवावा म्हणजे खाली देठ आणि वरती पाकळ्या प्रमाणे दिसेल. हवे तर हिरवा खाण्याचा रंग देठाना लावावा. अशा प्रकारे सगळी फुले बनवून ठेवावीत.नंतर गॅसवर कढई ठेवून फुले तळण्यासाठी त्यात तेल घालावे. तेल गरम झाले की ही फुले क्रीस्पी होईपर्यंत मस्त तळून घ्यावे. मस्त केशरी,तांबूस रंगाची ही फुले चाळणीत काढून तेल निथळले की वरून आवडीनुसार तिखट, चाट मसाला भुरभुरून सर्व्हिंग डिशमध्ये काढून सर्व्ह करावीत. ही गरम पण छान लागतातच पण थंड झाल्यावर जास्त क्रीस्पी बनतात आणि मस्त कुरकुरीत चटपटीत लागतात.

### वैशिष्ट्य :–

ही फुले साधारण तिखटमीठाच्या शंकरपाळी सारखी लागतात. चाट मसाल्यामुळे जास्तच सुरेख लागतात. भरपूर दिवस टिकतात. गौरी – गणपतीला, चैत्रगौरीला पुढे फराळाचे पदार्थ ठेवतात तेंव्हा ही लक्ष वेधून घेतात.या प्रमाणेच बनवून साजूक तुपात तळून वरती पिठीसाखर, वेलची पुड भुरभुरावी किंवा साखरेचा किंचीत लिंबू पिळून, वेलची, केशर घालून दोनतारी पाक करून त्यात फक्त बुडवून काढून सुकवले तरी ही गोडाची फुले खूप सुंदर लागतात.

पाकाच्या चमकदारपणामुळे खूपच आकर्षक दिसतात. पाहूनच खाण्याचा मोह आवरणार नाही आणि एकदा सुरुवात केली की मोह आवरणे कठीण होते.

**सौ.स्नेहा मुसरीफ, पुणे.**

# राष्ट्रध्वजाचे योग्य स्थान ध्वजस्तंभावरच !

स्वातंत्र्यदिन जवळ आला की सामाजिक संकेतस्थळांवर आपल्या देशप्रेमाची पावती देण्यासाठी झेंडे घेऊन सेल्फी काढण्यासोबत तिरंग्याच्या रंगाचे कपडे परीधान करून ग्रुप फोटो काढून ते अपलोड करणे, चेहऱ्यावर तिरंग्यासारखे टॅटू काढणे यांसारखे प्रकार या दिवसांत सर्रासपणे पाहायला मिळतात. तिरंग्याच्या तीन रंगाची या दिवशी इतकी क्रेझ असते कि, मिठाईच्या दुकानात तिरंगी पेढे आणि केकच्या दुकानांमध्ये तिरंगी केक्सना विशेष मागणी असते. राष्ट्रध्वजाच्या रंगाचा अशाप्रकारे होत असलेला सुमार वापर पाहिल्यावर राष्ट्रध्वज ही शोभेची वस्तू तर बनली नाही ना ? असा प्रश्न पडतो. राष्ट्रध्वज हा राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक आहे, त्याचा योग्य तो मान राखणे, हे प्रत्येक भारतीयाचे अलिखित कर्तव्य आहे. त्याग, क्रांती, शांती व समृद्धी या मूल्यांची शिकवण राष्ट्रध्वज आपल्याला देतो. उत्साहापोटी राष्ट्रध्वजाच्या रंगांचा गैरवापर करतांना आपण ही मूल्येच पायदळी तुडवत असतो. राष्ट्रध्वजाचे योग्य स्थान हे ध्वजस्तंभावरच असते. तोच ध्वजाचा उचित सन्मान असतो. सामाजिक संकेतस्थळांवर देशप्रेमाचा देखावा करण्याऐवजी ज्या क्रांतिकारकांनी देशासाठी प्राणार्पण करून स्वतंत्र भारताची ध्वजपताका डौलत ठेवली त्यांचे आदर्श कृतीत आणण्यासाठी प्रयत्न केल्यास तेच खरे देशप्रेम असेल.

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**
















# अलंकापुरी पुण्यभूमी पवित्र !!



भारताला पुण्यभूमी असे म्हणतात, तर महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी नदीच्या काठावर वसलेल्या अलंकापुरीला अर्थात आजच्या आळंदीला संतांनी पुण्यभूमी म्हटले आहे.

**अलंकापुरी पुण्यभूमी पवित्र**
**तिथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र**
**तया आठवितां महा पुण्यराशी**
**नमस्कार माझा ज्ञानेश्वरासी**

असा जयघोष करीत माऊली ज्ञानेश्वरांच्या हरिपाठास सुरुवात करून वंदन करतात.आळंदी हे महाराष्ट्राचे धार्मिक भावभावनांचे केंद्रबिंदू आहे. आळंदी श्रद्धा-भक्ती- शक्तीचे ऊर्जा स्त्रोत होय. आळंदी नाव स्मरताच ज्ञानेश्वर माऊलींचे वात्सल्य प्रेमाने ओसांडून जात असलेली दयाघन महाकैवल्य तेजाची संजीवन समाधी एकदम डोळ्यांपुढे उभी राहते. वारकरी संप्रदायात श्रीक्षेत्र पंढरपूर नंतर आळंदीचे अनन्य साधारण महत्त्व आहे.

**यात्रे अलंकापुरा येती**
**ते आवडती विठ्ठला**
**पांडुरंगी प्रसन्नपणे**
**केले देणे ज्ञाना**
**भू वैकुंठ पंढरपूर**
**त्याहुनी थोर महिमा या**
**निळा म्हणे जाणूनि संत**
**येती धांवत प्रतिवर्षी...**

अशा शब्दात संत निळोबारायांनी आळंदी क्षेत्राचा महिमा गायला आहे. जे वैष्णवजन अलंकापुराला श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी दर्शनासाठी आणि यात्रेसाठी येतात ते विठ्ठलाला प्रिय आहेत. विठ्ठलाच्या कृपा प्रसादानेच माऊलींना ज्ञानाचे दान मिळाले आहे. ज्याप्रमाणे संतांनी पंढरपूरला भूवैकुंठ मानून महिमा गायला आहे, त्याहूनी थोर महिमा आळंदीचा आहे. असे संत निळोबाराय अभंगातून म्हणतात. हे संतांना माहीत आहे, म्हणून वैष्णव दरवर्षी



आळंदीला मोठ्या श्रध्देने येतात व आजही शेकडो वर्षाची परंपरा कायमचं आहे.

आळंदी हे तीर्थक्षेत्र निव्वळ संततीर्थ नसून देव तीर्थही आहे.आळंदीला पौराणिकदृष्ट्या सुद्धा महत्त्व आहे. कृतयुगात आनंदवन, त्रेतायुगात वरुण क्षेत्र, द्वापारयुगात कपिल क्षेत्र, कलियुगात अलंकापुरी (आळंदी) तसेच या व्यतिरिक्त शिवतीर्थ, सिद्धक्षेत्र, अलंकावती, कर्णिका, अलंकापुरी आदी नावाने सुद्धा पुराणांमध्ये आळंदी क्षेत्राची ओळख करून दिल्याचे सांगितले जाते. आळंदी हे अठरा शिवपीठात वरिष्ठ मानले जाते. तसेच देवाधिदेव महादेवांचे कैलासानंतर सगळ्यात प्रिय स्थान म्हणजे अलंकापूर होय आणि ते इथेच सिद्धेश्वर रूपाने अखंड वास्तव्यास आहे. आळंदीची आणि पंढरीशी तुलना करताना संत निळोबाराय एका अभंगातून म्हणतात -

**एक भूवैकुंठ एक शिवपीठा**
**महिमा वरिष्ठ दोहींचा..**

यंदा संत ज्ञानेश्वर महाराजांची सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती आपण साजरी करीत आहोत. संत ज्ञानेश्वरांच्या पदस्पर्शाने, कर्तव्याने पुनीत झालेल्या आळंदीत अनेक संतांनी सहवास घालविला आहे.संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव, संत मुक्ताबाई, या ज्ञानेश्वरांच्या भावंडांच्या व्यतिरिक्त संत नामदेव, संत चांगदेव, संत गोरा कुंभार, संत सावता माळी, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार, संत सेना, संत जनाबाई. संत सोयराबाई ही संत मंडळी ज्ञानेश्वरांची समकालीन संत मंडळी होती. या संतांनी सुद्धा ज्ञानेश्वरांच्या नेतृत्वाखाली समता, समानता आणि भक्ती परंपरेला समृद्ध केले. जणू त्यांच्यासाठी आळंदी पुण्यभूमीच होती. या वारकरी संतांनी अलंकापुरी पुण्यक्षेत्री येऊन आपली आध्यात्मिक उन्नती साधली आणि या क्षेत्राचा महिमा गायला आहे. संत नामदेव एका अभंगातून म्हणतात-

**क्षेत्र महिमा अति अद्भुत**
**आदि सिद्धेश्वर कुलदैवत**
**अलंकापुरी पाटणी...**

संत सेना महाराजांनी तर आळंदीला संतांचे माहेर म्हटले आहे. तर पुढे संत सेना महाराजांनी ज्ञानदेवांना महाविष्णूचा अवतार म्हणून आदर केला आहे.

**महाविष्णूचा अवतार**
**सखा माझा ज्ञानेश्वर**
**चला जाऊं अलंकापुरा**
**संत जनाच्या माहेरा...**

तर शांतिब्रह्म संत एकनाथांनी तर

**सर्व सुखाची लहरी**
**ज्ञानाबाई अलंकापुरी...**

असे म्हटले आहे. संत नामदेवांची दासी म्हणून आपले जीवन भक्ती परंपरेला समर्पित करते. ती ज्ञानेश्वरी ग्रंथाचे रसग्रहण केल्यानंतर म्हणते...

**वाचावी ज्ञानेश्वरी**
**डोळां पहावी पंढरी...**

देवापेक्षा भक्त श्रेष्ठ, देवभूमीपेक्षा संतभूमी श्रेष्ठ. अशा भावस्थेतून आपल्या संतांनी आळंदीचा महिमा गायला आहे. आळंदी हे आद्य विश्व ज्ञानपीठ होय. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना स्फुरलेला 'ग्रामगीता ग्रंथ' सुद्धा आळंदी पुण्यभूमीची देण होय. आज ही आळंदीच्या पावनभूमीतून ज्ञानाचे झरे पाझरत आहे. हे या पुण्यभूमीचं अद्भुत रहस्य आहे. म्हणून संत कळकळीने म्हणतात-

**जोडोनियां दोन्ही हात**
**जगी जाणवितो मात**
**एकदा जा रे अलंकापुरा..**

**- आपला विश्वासू**
**शशिकांत तोटे, दारव्हा.**

## कृषि उत्पन्न बाजार समिती, लासलगांव, जि. नाशिक

स्थापना : ०१ एप्रिल १९४७

फोन नं. :- (०२५५०) २६६०१३, २६६०८९, २६६१६४, २६६४७३.

दैनिक अक्षराज च्या चतुर्थ वर्धापन दिनास हार्दिक शभेच्छा

श्री. ज्ञानेश्वर किसन जगताप
सभापती

श्री. संदीप पुंडलिक दरेकर
उपसभापती

### सन्माननीय सदस्य मंडळ

मा. श्री. बाळासाहेब रामनाथ क्षिरसागर · मा. श्री. भिमराज निवृत्ती काळे · मा. श्री. जयदत्त सिताराम होळकर · मा. श्री. गणेश वाल्मिक डोमाडे · मा. श्री. छबुराव सदाशिव जाधव

मा. श्री. राजेंद्र सदाशिव डोखळे · मा. सौ. सोनिया सत्यजित होळकर · मा. सौ. सुवर्णा ज्ञानेश्वर जगताप · मा. श्री. डॉ. श्रीकांत अमृता आवारे · मा. श्री. तानाजी देवराम आंधळे

मा. श्री. पंढरीनाथ कारभारी थोरे · मा. श्री. महेश बबन पठाडे · मा. श्री. राजेंद्र रामनाथ बोरगुडे · मा. श्री. प्रविण शिवाजी कदम · मा. श्री. बाळासाहेब किसन दराडे

मा. श्री. रमेश देवाजी पालवे · मा. श्री. कांतीलाल गायकवाड, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, निफाड · श्री. नरेंद्र सावळीराम वाढवणे, विद्यमान सचिव

### ठळक वैशिष्ट्ये

- शेतीमाल खरेदी-विक्री नियमन करून त्यासाठी बाजारपेठा स्थापन करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे.
- परीसरातील शेतकरी बांधवांसाठी लासलगांव मुख्य बाजार आवारावर कांदा, भुसार, तेलबिया, टोमॅटो, डाळींब व भाजीपाला लिलाव, निफाड उपबाजार आवारावर कांदा, भुसार, तेलबिया व भाजीपाला लिलाव आणि विंचुर उपबाजार आवारावर कांदा, भुसार व तेलबिया या शेतीमालाचे लिलाव सुरू.
- उगांव व नैताळे तात्पुरत्या खरेदी-विक्री केंद्रांवर हंगामात द्राक्षेमणी या शेतीमालाचे लिलाव सुरू.
- खानगांव न. तात्पुरत्या खरेदी-विक्री केंद्रावर दि. ०२/०२/२००९ पासून हंगामात द्राक्षेमणी व दि. ०१/०९/२०२० पासून मिरची व इतर भाजीपाला या शेतीमालाचे लिलाव सुरू.
- मानोरी खुर्द तात्पुरत्या खरेदी-विक्री केंद्रावर दि. १४/११/२०२३ पासून भुसार, तेलबिया व दि. ०३/०२/२०२४ पासून हंगामात द्राक्षेमणी या शेतीमालाचे लिलाव सुरू.
- चोख वजन, अधिकृत बाजार आकार, शेतमालाची रोख चुकवती.
- सन २०२४-२५ मध्ये शेतीमालाची एकूण आवक ७४,५०,९१७.०० क्विंटलची झाली व त्याची किंमत रू. १७,४०,६९,५७,१२३.०० झाली.

### कार्यक्षेत्र

दि. २८ डिसेंबर, १९९५ पासून निफाड तालुक्यातील पूर्व भागातील ६२ गांवे.

### बाजार आवारे

- मुख्य बाजार आवार, लासलगांव
- दुय्यम बाजार आवारे, निफाड व विंचुर.
- तात्पुरते खरेदी-विक्री केंद्र उगांव, नैताळे, खानगांव नजिक व मानोरी खुर्द.

### शेतकरी बांधवांसाठी सूचना

- बाजार समितीच्या बाजार आवारांवर शेतमाल विक्री करणाऱ्या शेतकरी बांधवांना शेतमाल विक्रीची संपुर्ण रक्कम Online पध्दतीने थेट बँक खात्यावर वर्ग करणेसाठी शेतकरी बांधवांनी आपली KYC करून घ्यावी.
- लासलगांव मुख्य बाजार आवारावर टोमॅटो ह्या शेतीमालाचे लिलाव सुरू झालेले आहे. तरी शेतकरी बांधवांनी आपला टोमॅटो हा शेतीमाल सुपर, किडका, पिचका, लहान (अपरीपक्व), खर्डा असलेला असा वेगवेगळा २० किलोच्या क्रेटस् मध्ये प्रतवारी करून विक्रीस आणावा.
- शेतमाल वजनमापानंतर शेतकरी बांधवांनी लगेचच संबंधित अडत्यांकडुन शेतमाल चुकवतीची संपुर्ण रक्कम रोख स्वरूपात घ्यावी. कोणीही जमा पावती घेऊ नये.

---

महाराष्ट्र नवनिर्माण सेना

दैनिक अक्षराज च्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

स्वातंत्र्य दिन... चिरायू होवो...

**श्री. योगेश रोहिदास पाटील**
उपजिल्हा अध्यक्ष म.न.से.कल्याण ग्रामीण

---

दैनिक अक्षराज च्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

वंदे मातरम्

अक्षराज — अचूक वेध, अचूक बातमी — चतुर्थ वर्धापनदिन

---: शुभेच्छुक :---

**श्री.अजित मंगळगिरीवार**
(उपाध्यक्ष)
नगर पंचायत पोंभूर्णा जि.चंद्रपूर

**श्री.राहुल संतोषवार**
(माजी जिल्हा परिषद सदस्य)
चंद्रपूर

---

दैनिक अक्षराज च्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !




अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाने समृद्ध असलेले एकमेव मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

## साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल

॥ स्वस्थस्य स्वास्थ्य रक्षणं आतुरस्य व्याधी परिमोक्षणं ॥

: फोन नंबर :
०२४८८-२९५५५५/२९५७७७,
मो.७०२०४४८३७४/९०११११६३३

### - उपलब्ध सुविधा -

- आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना
- योजना हिमोफेलिया ट्रिटमेंट सेंटर
- सुसज्ज अत्याधुनिक लॅब्रोटरी
- २ डी, ३ डी, ४ डीइको
- कार्डियाक ॲम्बुलन्स
- महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
- सर्व प्रकारचे तज्ञ डॉक्टर व अनुभवी टीम
- हाय स्पीड सी.टी. स्कॅन
- डिजिटल एक्स रे
- दुर्बिणीव्दारे तपासणी व शस्त्रक्रिया
- मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधी
- ३ सुसज्ज मॉड्युलर ऑपरेशन थेएटर
- सोनाग्राफी (कलर डॉप्लर)
- २४ तास तातडीची व अपघात सेवा
- २४ तास फिजिशयन (एम.डी.) उपलब्ध
- हेल्थ इन्शुरन्स सेवा उपलब्ध (कॅशलेस व रिअम्बेसमेंट)

पत्ता : टाकळी ढोकेश्वर, बाजारतळ ता. पारनेर, जि.अ.नगर

---

दैनिक अक्षराज च्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

अक्षराज — अचूक वेध, अचूक बातमी — चतुर्थ वर्धापनदिन

**राहुल शिंदे (पाटील)**
(अध्यक्ष : पारनेर तालुका भाजपा)

---

दैनिक अक्षराज च्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

## रोहित तायक्कानडो अकादमी

**दिवस आणि वेळ**
सोमवार बुधवार आणि शुक्रवार
सायंकाळी ७.३० ते ९.०० पर्यंत

**श्री.रोहित कदम**
प्रमुख प्रशिक्षक
राज्यस्तरीय पदक विजेते
राष्ट्रीय पंच

**वैष्णवी जांभळे** — वरीष्ठ सहायक प्रशिक्षक, राज्यस्तरीय खेळाडू
**ग्रिष्मा घाडीगांवकर** — सहायक प्रशिक्षक, राज्यस्तरीय खेळाडू
**नेत्रा सुतार** — सहायक प्रशिक्षक, राज्यस्तरीय खेळाडू
**प्रभास गायकवाड** — जिल्हास्तरीय पदक विजेता

पत्ता - भावसार समाज मंदिर हॉल, भोईवाडा कॅन्सर सोसायटीच्या जवळ, स्वराज्य बिल्डिंग नं ६ च्या समोर, परेल भोईवाडा मुंबई - ४०००१२.

---

दैनिक अक्षराज च्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

**श्री.राजकुमार इकडे** — पत्रकार
**श्री.मनोहर साबळे** — उद्योजक
**श्री.राजू पवार** — उद्योजक

शुभेच्छुक - समस्त रांजणगाव मशीद ग्रामस्थ